

दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव • लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१८२ | सोमवार दि.२१ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### दुष्काळ बैठकीत अधिकारी मोबाईल पाहण्यात दंग

अकोला: राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनातील अधिकारी खरोखरच संवेदनशील आहेत का?, हा प्रश्न निर्माण झाला आहे. नांदेडच्या दुष्काळाच्या आढावा बैठकीतील काजू-बदामच्या मुद्द्यानंतर आता अकोल्यात एक संतापजनक प्रकार समोर आला आहे. अकोल्यात कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी बोलावलेल्या अमरावती विभागीय आढावा बैठकीत अधिकारी चक्क मोबाईल पाहण्यात दंग असल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी या प्रकरणाची माहिती घेऊन कारवाई करु, असे म्हटले आहे. काँग्रेस आमदार अमित झनक यांनी कृषीमंत्र्यांच्या बैठकीतील हा प्रकार निंदनीय असल्याचे म्हटले आहे. एकीकडे लोकप्रतिनिधी दुष्काळाच्या मुद्द्यावर लोकप्रतिनिधी पोटतिडकीने बोलत असताना त्याच वेळी अनेक अधिकारी मात्र मोबाईलवर फेसबुक, व्हाट्सप पाहण्यात दंग असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

### राज ठाकरे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावेत–ठाकरे

पुणे: महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावेत, असे साकडे पुत्र आणि मनसे नेते अमित ठाकरे यांनी गणरायाच्या चरणी घातले. अमित ठाकरे यांनी पुण्याचे लाडके दैवत मानल्या जाणाऱ्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेतले. रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने हजारो भाविकांनी श्रीमंत दगडूशेठ हलावाई गणपतीचे दर्शन घेण्यासाठी अलोट गर्दी केली होती. अमित ठाकरे हे देखील डोक्यावर पारंपरिक फेटा बांधून श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच्या दर्शनासाठी पोहोचले. दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांचे प्रश्न यासाठी केवळ मंदिरात आल्यावर नाही, तर ३६५ दिवस देवाकडे प्रार्थना करतो, असे अमित ठाकरे यांनी नमूद केले. दरम्यान, केवळ प्रार्थना करण्यापेक्षा मैदानात उतरून लोकांचे प्रश्न सोडवणे मला अधिक महत्त्वाचे वाटते. देवाचे माझे एक वेगळे नाते आहे, असे अमित ठाकरे म्हणाले. राज ठाकरे यांच्यासाठी गणपती बाप्पाकडे काही मागणे मागितले का, यावर बोलताना, राज ठाकरे यांनी ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावे, असे अमित ठाकरे यांनी सांगितले.

### नेपाळ महापुरातील मृतांची संख्या १,४५०

काठमांडू: नेपाळमध्ये गेल्या महिन्यात आलेल्या विनाशकारी महापुरामुळे मृतांचा आकडा रविवारी १,४५० च्या पार गेला. पूर आलेल्या भागांमध्ये सुरू असलेल्या शोधमोहिमेदरम्यान आणखी काही मृतदेह सापडल्यामुळे मृतांचा आकडा १,४५१ इतका झाल्याचे पोलिसांनी सांगितले. या पुरामुळे चीनच्या बाजूलाही ४३ लोकांचा मृत्यू झाला असून, ५०० हून अधिक लोक अद्याप बेपत्ता आहेत, असे चिनी प्रसार माध्यमांनी म्हटले आहे. आतापर्यंत देशभरातून पूरग्रस्त १३,७८४ लोकांना वाचवण्यात आले आहे. पुरानंतर सुमारे ६,००० लोक अद्याप बेपत्ता आहेत, असा अंदाज नेपाळ पोलिसांनी वर्तवला आहे. नेपाळमध्ये बेपत्ता झालेल्यांचा शोध रसुवा आणि शेजारील जिल्ह्यांमधील नदीकिनारी, ढिगाऱ्यांच्या प्रदेशात आणि नुकसान झालेल्या जलविद्युत प्रकल्पांमध्ये सुरू आहे. भीषण महापुराला आता महिना होत आला असला, तरी या पुराच्या परिणामातून नेपाळ अजूनही सावरत आहे. या पुरामुळे पूर आलेल्या भागातील रस्ते आणि पुलांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ सप्टेंबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९७.५० क्विंटल | २,५०१ | ३,१५० | २,८९२ |
| ज्वारी/हायब्रिड: २१५.०० क्विंटल | ३,४५० | ५,६०० | ४,२७९ |
| मका/लोकल: ३२.०० क्विंटल | २,७२४ | २,७२४ | २,७२४ |
| तूर : ५.५० क्विंटल | ४,००० | ८,५०० | ७,४३७ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ७,७३० | ७,७३० | ७,७३० |
| बाजरी: १०.०० क्विंटल | २,८०० | ३,०४० | २,९१४ |
| मुग: ६.०० क्विंटल | ५,००० | १०,४५१ | ८,८२९ |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | ५,५०० | ५,९५० | ५,७१८ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,५०० | ६,००० | ५,७३३ |

# विकासकामे थांबवा; दुष्काळ जाहीर करा !

## संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना जगवण्यासाठी खर्च करा, आ.रोहित पवारांची सरकारकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

**सध्या राज्यातील बहुतांश भागात पावसाने हजेरी लावलेली दिसत नाही. त्यामुळं शेतकऱ्यांची पिकं वाया गेली आहे. अनेक ठिकाणी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे मराठवाडा पाहणी दौऱ्यावर आहेत. यावेळी ते बांधावर जाऊन थेट पिकांची पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत. शक्तीपीठ महामार्गासारख्या विकास कामांचा निधी दुष्काळग्रस्तांकडे वळवावा आणि तात्काळ मदत जाहीर करावी अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे. खरिपात ७५ टक्क्यांहून अधिक नुकसान झाले आहे. रब्बीचीही आशा मावळली आहे. पुढील दहा महिने शेतकऱ्यांना जगवण्याचे आव्हान असल्याचे पवार म्हणाले.**



खरिपात ७५ टक्क्यांहून अधिक नुकसान झाले आहे. त्यामुळे रब्बी हंगामाचीही आशा संपली असून, जनावरांच्या चाऱ्यासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ▶▶ पान २ वर

### अजित पवार असते तर नियम आणि अटींमध्ये अडकले नसते

शरद पवार एखाद्या प्रश्नावर सरकारला पत्र लिहून १० दिवसाचा वेळ देतात, त्यानंतर मार्ग निघाला नाही तर आक्रमकपणे रस्त्यावर उतरतात, हा इतिहास आहे. पवार साहेबांशी चर्चा केल्यानंतर आम्ही पाहणी दौऱ्याला सुरुवात केली असून, या पाहणीचा अहवालही आम्ही त्यांना देणार आहोत. आज अजित पवार असते तर नियम आणि अटींमध्ये अडकले नसते, ते जनतेसाठी काम करणारे नेतृत्व होते. जनतेच्या प्रश्नांची त्यांना जाणीव होती. मात्र आज महायुतीतील नेत्यांना जनतेच्या प्रश्नांचे देणे-घेणे नाही. पक्ष, आमदार- खासदार फोडाफोडीमध्ये त्यांना अधिक रस आहे असे रोहित पवार म्हणाले.

# राज्यात पावसाचे होणार पुनरागमन

## हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता



पुणे । प्रतिनिधी


राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली, तर काही जिल्हे अद्यापही पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. अशातच बंगालच्या उपसागरात हवामानातील बदलामुळे राज्यात पावसाचे पुनरागमन होत आहे. येत्या २१ ते २५ सप्टेंबर दरम्यान महाराष्ट्र आणि गोवा परिसरामध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. यामुळे राज्यातील ▶▶ पान २ वर

# रुग्णालयातील वैद्यकीय साहित्याच्या दरांवर अंकुश

## तुकाराम मुंढेंच्या पाहणीनंतर केंद्राच्या हालचाली

मुंबई । प्रतिनिधी

खासगी रुग्णि सर्जिकल वस्तूंसाठी आकारल्या जाणाऱ्या अवाजवी दरांवर केंद्र सरकारने लक्ष केंद्रित केले आहे. महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी वैद्यकीय साहित्याच्या खरेदी किमती आणि त्यावरील कमाल किरकोळ किंमत यांच्यातील मोठ्या तफावतीचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर केंद्र सरकारने



मेडिकल क्षेत्र आणि खासगी रुग्णालयांशी चर्चा सुरू केली आहे. या वस्तूंच्या किमती वाजवी करण्यासाठी केंद्राकडून नियमावली आणि किंमत नियंत्रणाच्या पर्यायांचा आढावा घेतला जात आहे.

महाराष्ट्र एफडीएने जुलै २०२६ मध्ये मुंबई महानगर प्रदेश, पुणे आणि छत्रपती संभाजीनगर परिसरातील सुमारे २० रुग्णालयांमध्ये वापरल्या जाणाऱ्या वैद्यकीय साहित्याच्या किमतींची पाहणी केली होती. या पाहणीत काही वस्तूंच्या रुग्णालयातील खरेदी किमती आणि रुग्णांच्या बिलावर आकारल्या जाणाऱ्या किमतीत मोठी तफावत असल्याचे आढळून आले. त्यानंतर एफडीएने ▶▶ पान २ वर

# राहुल गांधी यांनी स्टँड-अप कॉमेडियन बनावे!

## त्यांच्यामुळे काँग्रेस पक्ष बेरोजगार झाला–देवेंद्र फडणवीस



मुंबई । प्रतिनिधी

राहुल यांच्यामुळे काँग्रेस पक्षच बेरोजगार झाला आहे, त्यामुळे त्यांनी विनोदी कलाकार होण्याचा निर्णय घेतल्यास त्यांना किमान काहीतरी काम तरी मिळेल, असे फडणवीस म्हणाले. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पक्ष सोडून स्टँड-अप कॉमेडियन बनावे, असे टीका करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी म्हटले.

इंदूरमधील छात्रों की गूंज या कार्यक्रमात राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची खिल्ली उडवल्याच्या आरोपांबाबत विचारले असता फडणवीस म्हणाले, राहुल गांधी ज्या प्रकारे नक्कल करत आहेत, ते पाहता मला वाटते की त्यांनी पक्ष सोडून स्टँड-अप कॉमेडियन बनावे. राहुल यांच्यामुळे काँग्रेस पक्षच बेरोजगार झाला आहे, त्यामुळे त्यांनी विनोदी ▶▶ पान २ वर

# 'एसआयआर ही शहा-प्रेरित मोहीम'

## हा संविधानावर हल्ला असल्याचा काँग्रेसचा आरोप

दिल्ली । वृत्तसंस्था

मतदार याद्यांची सध्या सुरू असलेली विशेष सखोल पुनरावृत्ती प्रक्रिया म्हणजे मतदारांना वगळण्याची शहा-प्रेरित मोहीम असल्याचे काँग्रेसने रविवारी म्हटले. या प्रक्रियेमुळे मोठ्या प्रमाणावर नावे वगळली जात असून हा संविधानावर हल्ला असल्याचा आरोप पक्षाने केला आहे.

काँग्रेसचे सरचिटणीस (संपर्क विभाग) जयराम रमेश यांनी दावा केला की, एसआयआरच्या तिसऱ्या टप्प्यात समाविष्ट असलेल्या राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये, जवळपास दर तीनपैकी एका मतदाराचे नाव मतदार यादीतून वगळण्यात




आले आहे किंवा त्यांचे नाव वगळले जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. मतदार यादीतील नावे वगळण्याचे प्रमाण १७ टक्क्यांहून अधिक आहे. याव्यतिरिक्त, ५.४३ कोटी मतदारांना नोटिसा पाठवून त्यांची नावे मतदार यादीत कायम ठेवण्यासाठी अतिरिक्त कागदपत्रे सादर करण्यास सांगण्यात ▶▶ पान २ वर

# केतन अग्रवाल हत्येपूर्वी लोहगड परिसराची पाहणी; सोनम रघुवंशी प्रकरणाचाही केला 'अभ्यास'

## बनावट सोशल मीडिया खात्याद्वारे केतनला लोहगडावर बोलावल्याचा पोलिसांचा दावा

पुणे । प्रतिनिधी

केतन अग्रवाल हत्येपूर्वी आरोपींनी लोहगडासह लोणावळा परिसरातील उंच ठिकाणे आणि दऱ्यांची पाहणी करून हत्येसाठी 'स्पॉट' निश्चित केल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. एवढेच नव्हे, तर नव्या सांगवीतील एका तरुणीचा लोहगडावरून पडून झालेला मृत्यू तसेच देशभर चर्चेत आलेल्या सोनम रघुवंशी हत्या प्रकरणाची माहिती इंटरनेटवर शोधण्यात आल्याचेही तपासात उघड झाले आहे. पुणे ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणाचा तपास




पूर्ण करून वडगाव मावळ न्यायालयात तब्बल ५ हजार ५३ पानी दोषारोपपत्र दाखल केले आहे.

सिया प्रवीण गोयल, चेतन बाबूलाल चौधरी आणि रितेश संजय हंगे यांच्याविरोधात हे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी या प्रकरणात १०० हून अधिक साक्षीदारांचे जबाब नोंदविले असून, काही महत्त्वाच्या साक्षीदारांचे जबाब फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६४ अन्वये नोंदविण्यात आले आहेत. सिया आणि चेतन यांच्या गुन्ह्याशी संबंधित हालचाली काही साक्षीदारांनी पाहिल्याचेही तपासात नमूद करण्यात आले आहे. दोषारोपपत्रातील माहितीनुसार, केतनला लोहगडावर तिसऱ्यांदा बोलावण्यासाठी 'माही' या नावाने बनावट सोशल मीडिया खाते तयार करण्यात आले होते. ▶▶ पान २ वर

# एसटीच्या ताफ्यात दाखल होणार २०० अत्याधुनिक 'व्होल्वो' बसेस; मंत्री सरनाईक यांची घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्राच्या एसटी महामंडळाने आता खासगी आराम बससेवांकडे वळणाऱ्या प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी लवकरच महामंडळाच्या ताफ्यात स्वमालकीच्या २०० अत्याधुनिक, वातानुकूलित व्होल्वो बसेस दाखल करण्यात येणार आहेत.**



यामध्ये सुरक्षितता, आरामदायीपणा, आधुनिक तंत्रज्ञान आणि दर्जेदार प्रवासी सेवेचा संगम या नव्या सेवेत पाहायला मिळणार आहे, अशी माहिती परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. विशेष म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणात पहिल्यांदाच एसटी महामंडळाच्या टप्प्यामध्ये व्होल्वो बसेस समाविष्ट होत असल्याचेही त्यांनी सांगितले. सरनाईक म्हणाले, लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी सध्या अनेक प्रवासी अधिक भाडे देऊन खासगी ▶▶ पान २ वर

# पेट्रोलपंपांना डिजिटल पेमेंट शुल्कातून सवलत द्या

## पेट्रोल विक्रेत्यांची केंद्र सरकारकडे मोठी मागणी

पुणे । प्रतिनिधी

पेट्रोल व डिझेल विक्री करणाऱ्या पेट्रोलपंपांना यूपीआय व्यवहारांवरील व्यापारी सवलत दर, प्रति-व्यवहार शुल्क तसेच अन्य डिजिटल पेमेंट शुल्कातून पूर्णपणे सवलत द्यावी, अशी मागणी फेडरेशन ऑफ ऑल महाराष्ट्र पेट्रोल डीलर्स



असोसिएशनने केंद्राकडे केली आहे. केंद्रीय अर्थमंत्री, पेट्रोलियम व नैसर्गिक वायूमंत्री, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया तसेच नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि तेल विपणन कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

पेट्रोलियम विक्री अत्यावश्यक सेवा असून, पेट्रोल व डिझेलचे विक्री दर सरकार आणि तेल विपणन कंपन्यांच्या धोरणानुसार ▶▶ पान २ वर

# अंतरवलीतील कीर्तनाचा सोशल मीडियावर 'तमाशा'

## वारकरी संप्रदायाची चौकट ओलांडल्याने कीर्तनकार नेटकऱ्यांच्या रडारवर

बीड –पुणे । सुभाष चौरे

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या १७ दिवसांच्या आमरण उपोषणाने संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले होते. या आंदोलनाला राज्यभरातून मोठा पाठिंबा मिळाला. मात्र, उपोषणस्थळी जनजागृती आणि समाजप्रबोधनाच्या नावाखाली झालेल्या काही कीर्तनकारांच्या कीर्तनांवरून आता सोशल मीडियावर जोरदार वाद पेटला असून, या पवित्र परंपरेचा अक्षरशः 'तमाशा' झाल्याची टीका होत आहे.**



संत परंपरेत कीर्तन हे केवळ अध्यात्म, भक्ती, सदाचार आणि नीतिमत्ता शिकवणारे साधन मानले गेले आहे. वारकरी संप्रदायाची शिकवण कोणत्याही एका जाती-धर्मापुरती मर्यादित नसून, ती सर्वसमावेशक आहे. संप्रदायाचे नियम, मर्यादा आणि कीर्तनाची चौकट स्पष्ट असताना अंतरवली सराटीत झालेल्या

### वारकरी परंपरेच्या अस्मितेचा प्रश्न

वारकरी संप्रदाय हा जात-पात आणि पंथाच्या पलीकडे जाऊन विठ्ठल नामाचा गजर करणारा विशाल समाज आहे. कीर्तन कुठे करावे, त्याचे औचित्य काय असावे आणि व्यासपीठाची मर्यादा कशी राखावी, याचे काही अलिखित नियम शतकानुशतके पाळले गेले आहेत. मात्र, अंतरवली सराटीतील प्रकारामुळे कीर्तनाचे मूळ उद्दिष्ट बाजूला पडून त्याला निव्वळ भावनिक आणि राजकीय स्वरूप आले, ज्यामुळे डिजिटल पटलावर या पवित्र परंपरेची नाहक खिल्ली उडवली जात असल्याची भावना वारकरी जगतातून व्यक्त होत आहे. एवढेच काय मागील काळात तर एका मोठ्या महंतांनी कीर्तनात पांडुरंग पहावयाचा असेल तर अंतरवाली सराटीमध्ये जा, मराठा समाजासाठी जगतोय तोच आहे पांडुरंग. जरांगे पाटील यांना पांडुरंगाची तर अंतरवलीला पंढरपुराची उपमा दिली गेल्याचा उल्लेख काही नेटकऱ्यांनी केला आहे.




कीर्तनांमध्ये मात्र आध्यात्मिक प्रबोधनाऐवजी राजकीय आणि सामाजिक आंदोलनाचाच सूर अधिक उमटल्याचे दिसून आले. आंदोलनस्थळी हजेरी लावलेल्या अनेक कीर्तनकारांनी देव, धर्म, आचरण आणि भक्तीभाव यावर बोलण्याऐवजी 'आरक्षण कसे मिळवायचे', 'आरक्षणासाठी काय करायला हवे' आणि 'मनोज जरांगे ▶▶ पान २ वर

cmyk



## अग्रलेख

# इंदूरमध्ये 'छात्रों की गूंज'चा आवाज घुमला; गर्दीचा सैलाब, मंचावर सुरक्षा वाद

शिक्षण, बेरोजगारी, पेपरफुटी आणि स्पर्धा परीक्षांच्या प्रश्नांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी आयोजित काँग्रेसच्या 'छात्रों की गूंज' कार्यक्रमाला शनिवारी इंदूरमध्ये मोठा प्रतिसाद मिळाला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमासाठी अपेक्षेपेक्षा मोठ्या संख्येने विद्यार्थी व युवक दाखल झाले. मैदानाबाहेरही गर्दी झाल्याने वाहतूक व्यवस्थेवर ताण आला. मात्र, विद्यार्थ्यांचा आवाज घुमण्यापूर्वीच सुरक्षा व्यवस्थेवरून प्रशासन आणि आयोजकांमध्ये निर्माण झालेल्या वादाने कार्यक्रमाला राजकीय रंग दिला.

राहुल गांधी यांच्या कार्यक्रमासाठी इंदूर पोलिसांनी तब्बल ३१ सुरक्षा अटी लागू केल्या होत्या. गर्दीचे नियोजन, सेक्टरनिहाय व्यवस्था, प्रवेश-निर्गमन मार्ग, सीसीटीव्ही, मेटल डिटेक्टर, स्वयंसेवक, वैद्यकीय पथक आणि आपत्कालीन मार्ग यांसह विविध बाबींचा त्यात समावेश होता. आयोजकांकडून सुरक्षेच्या जबाबदारीबाबत शपथपत्रही मागविण्यात आले. या अटींमध्ये माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या १९९१ मधील हत्याकांडाच्या पार्श्वभूमीचा आणि न्यायमूर्ती जे. एस. वर्मा आयोगाच्या संदर्भाचा उल्लेख झाल्याने काँग्रेसने आक्षेप घेतला. पोलिसांनी मात्र सुरक्षा जबाबदाऱ्या स्पष्ट करण्यासाठी हा संदर्भ असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे ठिकाण नेहरू स्टेडियमऐवजी आयडीए मैदानावर हलविण्यापासूनच प्रशासन आणि आयोजकांमध्ये मतभेद असल्याचे समोर आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांशी संवाद साधणाऱ्या कार्यक्रमाला इतक्या प्रशासकीय अटी आणि वादांच्या भोवऱ्यात का जावे लागले?, हा प्रश्न राजकीय वर्तुळात चर्चेत आला. कार्यक्रमादरम्यान सुरक्षा व्यवस्थेवरून पोलिस अधिकारी, राहुल गांधी यांच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळणारे माजी एसपीजी अधिकारी आणि आयोजक-वॉलंटियर्स यांच्यात वाद झाल्याचे वृत्त आहे. हा वाद वाढल्यानंतर मंचावर धक्काबुक्कीची परिस्थिती निर्माण झाल्याचे व्हिडिओ समोर आले. व्हीआयपी प्रवेश, मंचावरील हालचाली आणि सुरक्षा व्यवस्थेच्या अंमलबजावणीवरून नेमका वाद कशामुळे झाला, याबाबत वेगवेगळे दावे समोर आले आहेत. त्यामुळे या घटनेची अधिकृत वस्तुस्थिती स्पष्ट होणे महत्त्वाचे ठरणार आहे. राहुल गांधी यांनी आपल्या भाषणातून केंद्र सरकारच्या कार्यपद्धतीवर जोरदार टीका केली. सध्याची व्यवस्था प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा 'अंधभक्त' तयार करू इच्छिते, असा आरोप त्यांनी केला. पेपरफुटी, बेरोजगारी, शिक्षणव्यवस्था, स्पर्धा परीक्षा आणि सरकारी भरतीतील अडचणींचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. विद्यार्थ्यांनीही वैद्यकीय व नर्सिंग शिक्षण, एमपीएससी, सरकारी नोकऱ्या आणि शिक्षण क्षेत्रातील प्रशासकीय अडचणी राहुल गांधी यांच्यासमोर मांडल्या. त्यामुळे कार्यक्रमात राजकीय भाषणासोबत विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष प्रश्नांनाही व्यासपीठ मिळाले. 'छात्रों की गूंज'च्या माध्यमातून काँग्रेसने शिक्षण आणि रोजगाराच्या प्रश्नांना युवा चर्चेच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न केला. दुसरीकडे, कार्यक्रमाच्या आधीपासूनच सुरक्षा अटी, कार्यक्रमस्थळ आणि राजकीय आरोप-प्रत्यारोपांमुळे वातावरण तापले होते. विद्यार्थी प्रश्न विचारत आहेत; प्रशासन सुरक्षेच्या अटी सांगत आहे; सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप करत आहेत. मग बेरोजगारी, पेपरफुटी, महागडे शिक्षण आणि रखडलेल्या भरतीसारख्या मूलभूत प्रश्नांची उत्तरे कोण देणार? इंदूरच्या 'छात्रों की गूंज'ने किमान एवढे स्पष्ट केले की, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना राजकीय रंग दिला जाऊ शकतो; मात्र प्रश्न विचारण्याचा अधिकार आणि त्या प्रश्नांना उत्तर देण्याची सत्तेची जबाबदारी यापासून कोणालाही पळता येणार नाही.

# शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही; केंद्र व राज्यकडून मदत मिळवून देणार-आ.लोणीकर

## जिल्ह्यातील पहिला आ. शेतकऱ्यांच्या बांधावर; उडीद पिकाचे गुंठ्याला ३७० ग्रॅम उत्पादन

जालना । प्रतिनिधी

**जालना जिल्ह्यातील परतुर मंठा विधानसभेचे आमदार बबनराव लोणीकर हे पहिले आमदार आज दुष्काळग्रस्त भागातील मंठा आणि परतुर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले. व झालेले त्यांनी नुकसानग्रस्त भागाची दिवसभर पाहणी केली. तसेच ते म्हणाले की एकही शेतकऱ्याला मदतीपासून वंचित ठेवणार नाही असे ते म्हणाले.**

जालना व मंठा तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी पांगरी गोसावी, नियर सेवली, शिवनगिरी, जयपूर, खोराड, सावंगी, माळतोंडी व गेवराई या गावांचा दुष्काळ पाहणी दौरा केला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन पिकांची पाहणी केली, शेतकरी व ग्रामस्थांशी संवाद साधला आणि दुष्काळामुळे निर्माण झालेल्या अडचणी जाणून घेतल्या. पांगरी गोसावी येथे उडीद व मूग पिकाचा पीक कापणी प्रयोग करण्यात आला. एका गुंठ्यामध्ये केवळ ३७० ग्रॅम उडीद उत्पादन झाल्याचे समोर आले. अत्यल्प उत्पादनामुळे शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकटाचे गांभीर्य स्पष्ट झाले असून, बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळणे आवश्यक असल्याचे आमदार लोणीकर यांनी नमूद केले. दुष्काळ पाहणी दौऱ्यादरम्यान आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घेतल्या. सोयाबीनच्या शेतामध्ये शेतकरी बांधवांसोबत जमिनीवर बसून केळीच्या पानावर ज्वारीची भाकर, मुगाची भाकर, पिठलं, ठेचा आणि लोणचं असा साधा शेतकरी भोजनाचा आस्वाद घेतला. कुठलाही बडेजाव अथवा तामझाम न करता शेतकऱ्यांसोबत जेवण करत त्यांनी आपले शेतकरी कुटुंबाशी असलेले नाते अधोरेखित केले. ''मी आ. असलो तरी सर्वात अगोदर शेतकऱ्याचा मुलगा आहे. मला शेतीमधील काम कळते. शेतकऱ्याचे दुःख आणि त्याची वेदना मला माहीत आहे,'' असे त्यांनी सांगितले. पाच वेळा आमदार आणि एक वेळा राज्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून जबाबदारी पार पाडताना शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठवला असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दौऱ्यादरम्यान परिसरातील माता-भगिनींनी आमदार बबनराव लोणीकर यांच्यासमोर पाणीटंचाईच्या गंभीर समस्या मांडल्या. कुटुंबासाठी पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाण्याची उपलब्धता आणि शेतीसाठी आवश्यक पाण्याचा अभाव यामुळे ग्रामीण भागातील जनजीवन मोठ्या अडचणीत सापडले असल्याचे त्यांनी सांगितले.



पाण्याअभावी दैनंदिन कामकाजावर होणारा परिणाम तसेच पशुधन सांभाळताना येणाऱ्या अडचणींची व्यथा माता-भगिनींनी मांडली. यावेळी आमदार लोणीकर यांनी त्यांच्या समस्या गांभीर्याने ऐकून घेतल्या आणि पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये तातडीने उपाययोजना करण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचा विश्वास दिला. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांना निश्चित मदत मिळवून दिली जाईल, तसेच पीक विम्याचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित शेतकरी बांधव व माता-भगिनींना दिले. केंद्र सरकारच्या मदतीसाठी काही कालावधी लागू शकतो; मात्र त्याची वाट न पाहता राज्य सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील दुष्काळी परिस्थितीची सर्वप्रथम पाहणी करण्यासाठी आपण दुष्काळ पीक पाहणी दौरा केला होता आणि त्याचा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सादर केला असल्याचे त्यांनी सांगितले. या अहवालाच्या आधारे दुष्काळ जाहीर करण्यासाठी आणि बाधित शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. दुष्काळी परिस्थितीचे मूल्यमापन करताना केवळ जिल्ह्याच्या सरासरी पर्जन्यमानावर निर्णय न घेता तालुकानिहाय पर्जन्यमान, पिकांची स्थिती आणि प्रत्यक्ष नुकसानीचा विचार करणे आवश्यक असल्याचे आमदार लोणीकर यांनी सांगितले. पिकांचे नुकसान, पावसातील तूट आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणारे संभाव्य परिणाम लक्षात घेऊन औपचारिक निकषांची वाट न पाहता तातडीच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. पाणीटंचाईग्रस्त गावांचे तातडीने सर्वेक्षण करून शासकीय टँकर सुरू करावेत, टँकर मंजुरीची प्रक्रिया सुलभ करावी, मागणीनुसार चारा छावण्या सुरू कराव्यात तसेच पशुधनासाठी पिण्याचे पाणी व पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर शासनाने संवेदनशीलतेने निर्णय घ्यावा, यासाठी आपला पाठपुरावा सुरू राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. ''हे सरकार शेतकऱ्यांचे सरकार आहे. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून निश्चितपणे मदत मिळवून दिली जाईल,'' असा विश्वास आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे पीक नुकसान, पाणीटंचाई, पीक विमा आणि शासनाच्या मदतीसंदर्भातील प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी आवश्यक त्या पातळीवर पाठपुरावा करण्याची ग्वाही त्यांनी दिली. शेतकऱ्यांच्या बांधावर जाणे, त्यांच्या अडचणी ऐकणे आणि त्यांच्या हक्कासाठी शासनदरबारी आवाज उठवणे ही आपली राजकीय जबाबदारीच नव्हे, तर बांधिलकी असल्याचे त्यांनी सांगितले. ''शेतकरी सुखी, तर महाराष्ट्र सुखी! शेतकरी बांधवांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी माझा संघर्ष अविरत सुरूच राहील,'' असा निर्धार आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला. यावेळी उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, रामदास दौंड, तहसीलदार सुमन मोरे श्री गवळी, तालुका कृषी अधिकारी दयानंद वाघमोडे,व सर्व कार्यकर्ते व नुकसानग्रस्त शेतकरी यांच्यासह महसूल पंचायत कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते शेतकरी माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# वारकरी संप्रदायातील आनंदराव देशमुख यांचे निधन

मंठा । प्रतिनिधी

देवठाणा-उस्वद येथील वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ नागरिक आनंदराव किसनराव देशमुख (वय ६१) यांचे शनिवारी (ता. १९) सकाळी ९ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने देवठाणा-उस्वद परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



आनंदराव देशमुख हे धार्मिक व आध्यात्मिक वृत्तीचे असून वारकरी संप्रदायाशी त्यांचा निकटचा संबंध होता. सामाजिक व धार्मिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग असायचा. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ तसेच वारकरी संप्रदायातील भाविकांनी त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. शनिवारी सकाळी हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी दुपारी देवठाणा-उस्वद येथील गावातील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, ग्रामस्थ, मित्रपरिवार व परिचित मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे. फोटोग्राफर पंकज देशमुख यांचे ते वडील होत. त्यांच्या निधनाने देशमुख कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरातून शोक व्यक्त केला जात आहे.

# चकलांबा येथे अखंड हरिनाम सप्ताह; आज डॉ. गणेश महाराज बडे यांचे कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील रोकडेश्वर मंदिरात प्रति वर्षाप्रमाणे याहीवर्षी अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास दि. शुक्रवारी दि.१८ सप्टेंबर पासून प्रारंभ झाला आहे. या सप्ताहात दुपारी २.०० ते ४.०० या वेळात सुप्रसिद्ध रामायणाचार्य ह.भ.प. यांच्या राम कथेचे आयोजन करण्यात आले आहे.**

सप्ताहात दैनिक कार्यक्रमात पहाटे ४.०० ते ६.०० काकडा, ६.०० ते ६.३० विष्णु सहस्रनाम, ६.३० ते ९.३० ज्ञानेश्वरी पारायण, १०.०० ते १२.०० गाथा भजन, दुपारी २.०० ते ४.०० रामकथा, ४.०० ते ५.०० प्रवचन, ५.०० ते ६.०० हरिपाठ, रात्री ८.०० ते १०.०० हरीकीर्तन, आणि त्यानंतर जागर होणार आहे.



सप्ताहाच्या ४ थ्या सोमवारी दिवशी ह.भ.प. डॉ. महंत गणेश महाराज बडे, दुर्गाशक्तीगड, संस्थान, भिलवडा, यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. तर दुपारी ह.भ.प. डॉ. सुधाकर म. शास्त्री यांचे प्रवचन होणार आहे. मंगळवार दि. २२ रोजी महेंद्र महाराज मळेकर, भगवानगड, यांचे कीर्तन तर ह.भ.प. सखाराम महाराज तांगडे यांचे प्रचन, दि.२३ रोजी ह भ प महामंडलेश्वर १००८ त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी महाराज, गणेशानंदगड, यांचे कीर्तन, व ह भ प भगवान महाराज खेडकर जुन्नर यांचे प्रवचन होणार आहे. सप्ताहात दिनांक २४ रोजी महंत ह.भ.प. डॉ. नामदेव महाराज शास्त्री मठाधिपती, भगवानगड यांचे दुपारी ११.०० ते १.०० या वेळात काल्याचे किर्तन होणार आहे.

## पान १ वरून...

### राज्यात पावसाचे

अनेक जिल्ह्यांना दिलासा मिळणार असून, अंतर्गत भागातही पावसाचा जोर वाढणार आहे, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. दक्षिण कोकण-गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी ताशी ३०-४० किमी वेगाच्या वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस/मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. उत्तर कोकणातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस, ताशी ४०-५० किमी वेगाचे वादळी वारे आणि हलका ते मध्यम पाऊस/मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक घाट, अहिल्यानगर, पुणे, पुणे घाट, कोल्हापूर, कोल्हापूर घाट, सातारा, सातारा घाट, सांगली, सोलापूर, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळे आणि हलका ते मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वारा येण्याची शक्यता आहे. दरम्यान, २१ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर या कालावधीत महाराष्ट्राच्या बहुतांश भागांत चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहेत. हा मान्सूनच्या हंगामाचा शेवटचा टप्पा असून, या पावसामुळे कोरड्या हवामानातून दिलासा मिळू शकतो.

-----------

### विकासकामे थांबवा;

गंभीर बनला आहे. पुढील दहा महिने सर्वसामान्य शेतकऱ्यांना कसे जगवायचे, हा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे सरकारने तात्काळ मदत जाहीर करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रोहित पवार यांनी केली आहे. रोहित पवार हे मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी दौऱ्यावर आहेत. धाराशिव आणि बीड जिल्ह्यांतील पाहणीनंतर ते लातूर जिल्ह्यातील किनगाव येथे दाखल झाले. यावेळी किनगावमधील शेतकऱ्यांनी रोहित पवार यांच्यासमोर आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या. प्रशासनाकडून पंचनामे आणि मदत मिळत नसल्याबद्दल शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. शक्तीपीठ महामार्गासारखी विकासकामे थांबवून त्यासाठीचा पैसा सध्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना जगवण्यासाठी खर्च करावा, अशी मागणीही रोहित पवार यांनी केली. तात्काळ दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली आहे.

---------

### राहुल गांधी यांनी स्टँड-अप

कलाकार होण्याचा निर्णय घेतल्यास त्यांना किमान काहीतरी काम तरी मिळेल, असे फडणवीस म्हणाले. तसेच, काही लोक विशिष्ट यूपीआय व्यवहारांवर शुल्क आकारण्याबाबत एक विशिष्ट जनमत तयार करण्याचा प्रयत्न करत आहेत. सरकारने सुधारित मर्चंट डिस्काउंट रेट मागे न घेतल्यास, १५ ऑक्टोबरपासून २,००० रुपयांवरील यूपीआय पेमेंट स्वीकारणे बंद करण्याची धमकी मुंबईतील पेट्रोल पंप चालकांनी दिली आहे. याबद्दल विचारले असता ते म्हणाले की, अशी भूमिका घेणे अयोग्य आहे कारण यूपीआयमुळे त्यांचा व्यवसाय वाढला आहे. त्यांचे व्यवहार पारदर्शक झाले आहेत आणि लोकही मोठ्या प्रमाणावर यूपीआयचा वापर करत आहेत. त्यावर अगदी नाममात्र शुल्क आकारले गेले आहे. ज्या संसदीय समितीने एमडीआर लागू करण्याची शिफारस केली होती, त्यात माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम आणि इतर तीन वरिष्ठ काँग्रेस नेत्यांचा समावेश होता. सरकारने स्पष्ट केले आहे की, हे शुल्क सर्व व्यवहारांवर नाही, तर केवळ विशिष्ट व्यवहारांवर लागू होते. तरीही एक विशिष्ट जनमत तयार करण्याचा प्रयत्न केला जात आहे. भ्रष्टाचार कमी करण्यात यूपीआय व डिजिटल व्यवहारांची भूमिका प्रत्येकाने समजून घेतली पाहिजे. खर्चाचा भार उचलण्यासाठी अगदी नाममात्र रक्कम आकारण्याचा निर्णय वाजवी आहे आणि पेट्रोल पंप मालक व व्यापाऱ्यांनी ते भरण्यास विरोध करू नये, असेही त्यांनी नमूद केले.

--------------

### रुग्णालयातील वैद्यकीय साहित्याच्या

राष्ट्रीय औषध किंमत निर्धारण प्राधिकरणाकडे वैद्यकीय उपकरणांच्या किमतींचे तर्कसंगतीकरण करण्याबाबत प्रस्ताव पाठवला. या पाहणीत एका आयव्ही सेटचे उदाहरण विशेष चर्चेत आले. रुग्णालयाने सुमारे ११ रुपयांना खरेदी केलेल्या या सेटची किंमत तब्बल ३२५ रुपये असल्याचे आढळले. म्हणजेच खरेदी किंमत आणि एमआरपी मध्ये मोठा फरक दिसून आला. सिरिंज, कॅथेटर, नेब्युलायझर, ऑक्सिजन मास्क यांसारख्या इतर वैद्यकीय वस्तूंच्याही किमतींमध्ये मोठी तफावत आढळल्याचे एफडीएच्या पाहणीत समोर आले. तुकाराम मुंढे यांनी या दरांबाबत प्रश्न उपस्थित करताना वैद्यकीय क्षेत्रातील उत्पादक, वितरक, रुग्णालये आणि रुग्ण या सर्वांच्या हिताचा विचार करून किंमत रचना निश्चित करण्याची गरज व्यक्त केली आहे. गुणवत्तेशी तडजोड न करता रुग्णांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी वैद्यकीय उपकरणांच्या किंमती पारदर्शक आणि वाजवी असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. मुंढे यांच्या पाहणीनंतर केंद्राच्या औषध विभागाने खासगी रुग्णालयांशी त्यांच्या बिलिंग पद्धती, वैद्यकीय साहित्याची खरेदी आणि रुग्णांकडून आकारल्या जाणाऱ्या किमती याबाबत चर्चा सुरू केली आहे. केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा यांनी औषध विभागाच्या सचिवांना मेडिकल क्षेत्र आणि रुग्णालयांच्या प्रतिनिधींशी बैठक घेण्याच्या सूचना दिल्याचे वृत्त आहे. केंद्राने या प्रकरणी अहवाल मागवला आहे. सध्या आवश्यक औषधांपैकी 'नॅशनल लिस्ट ऑफ एसेन्शियल मेडिसिन्स'मध्ये समाविष्ट असलेल्या औषधांच्या किमतींवर औषध किंमत नियंत्रण आदेशाच्या माध्यमातून नियंत्रण ठेवले जाते. मात्र, अनेक वैद्यकीय उपकरणे आणि रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या सर्जिकल वस्तूंसाठी अशी प्रभावी किंमत नियंत्रण व्यवस्था नसल्याचा मुद्दा पुढे आला आहे. त्यामुळे आवश्यक वैद्यकीय उपकरणांना औषधांप्रमाणेच किंमत नियंत्रणाच्या चौकटीत आणता येईल का, याचा केंद्र सरकारकडून विचार सुरू आहे. यामध्ये केवळ चढझ निश्चित करण्याऐवजी उत्पादक किंमत, व्यापारातील मार्जिन आणि रुग्णालयांकडून आकारली जाणारी अंतिम किंमत यामध्ये पारदर्शकता आणण्यावर भर दिला जाऊ शकतो. वैद्यकीय उपचारांचा वाढता खर्च आणि रुग्णांच्या खिशातून होणारा खर्च कमी करण्याच्या पार्श्वभूमीवर आता वैद्यकीय उपकरणांच्या किंमतींच्या नियमनाचा मुद्दा केंद्राच्या अजेंड्यावर आला आहे. मात्र, किंमत नियंत्रण करताना रुग्णांना परवडणाऱ्या दरांसोबत उत्पादक आणि रुग्णालयांच्या प्रत्यक्ष खर्चाचाही विचार करावा लागणार असल्याचे वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिनिधींनी म्हटले आहे.

--------------

### केतन अग्रवाल हत्येपूर्वी लोहगड परिसराची

सियाची मैत्रीण असल्याचे भासवून या खात्याद्वारे केतनशी संपर्क साधण्यात आला. वाढदिवस साजरा करण्याच्या बहाण्याने केतनला लोहगडावर बोलावण्यात आले आणि त्यानंतर हत्येचा कट अमलात आणण्यात आल्याचा पोलिसांचा दावा आहे. या प्रकरणात आरोपींच्या मोबाईलमधील डेटा, व्हॉट्सप संभाषणे, छायाचित्रे, कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर), तांत्रिक विश्लेषणाचे अहवाल व प्रमाणपत्रे तसेच विविध कागदपत्रे पुरावे म्हणून दोषारोपपत्रात समाविष्ट करण्यात आली आहेत. सिया आणि चेतन यांनी मार्च २०२५ मध्ये नव्या सांगवीतील एका २१ वर्षीय तरुणीचा लोहगडावरून पडून झालेल्या मृत्यूची माहिती इंटरनेटवर शोधल्याचे तपासात समोर आले आहे. त्याचबरोबर सोनम रघुवंशी हत्या प्रकरणाची माहितीही इंटरनेटवर शोधण्यात आल्याचे पोलिसांनी दोषारोपपत्रात नमूद केले आहे. याशिवाय गुन्हेगारी घटना आणि हत्या दाखविणारे काही चित्रपट पाहिल्याचेही तपासात आढळल्याचा दावा करण्यात आला आहे. केतनच्या हत्येसाठी योग्य ठिकाण निश्चित करण्याच्या उद्देशाने लोणावळा परिसरातील विविध ठिकाणांची पाहणी करण्यात आल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. २१ मे रोजी टायगर पॉइंटसह परिसरातील उंच ठिकाणे आणि दऱ्यांची पाहणी करण्यात आली. त्यानंतर ३१ मे रोजी सिया चेतनला लोहगडावर घेऊन गेली. यावेळी केतनला नेमक्या कोणत्या ठिकाणाहून ढकलायचे, यासाठी जागा निश्चित करण्यात आल्याचे दोषारोपपत्रात नमूद करण्यात आले आहे. केतनचे हात-पाय तोडायचे की अन्य व्यक्तीकडून त्याची हत्या करून घ्यायची, यासंदर्भातील चर्चेत रितेश हंगे सहभागी असल्याचा पोलिसांचा दावा आहे. गुन्हा केल्यानंतर पोलिसांच्या कारवाईपासून कसे वाचायचे, घटनास्थळी सीसीटीव्ही नसल्याची खबरदारी कशी घ्यायची आणि मोबाईलचा वापर कसा टाळायचा, याबाबत हंगेने सिया आणि चेतनला मार्गदर्शन केल्याचेही दोषारोपपत्रात नमूद करण्यात आले आहे. मोबाईल आणि सोशल मीडिया व्यवहारांपासून घटनास्थळाच्या पाहणीपर्यंत विविध डिजिटल आणि तांत्रिक पुरावे पोलिसांनी दोषारोपपत्रात जोडले आहेत. आता या प्रकरणातील पुढील न्यायालयीन कार्यवाहीकडे लक्ष लागले आहे.

----------

### 'एसआयआर ही

आले आहे. नाव वगळले जाण्याचा हा धोका आणखी १५ टक्के इतका आहे, असे रमेश यांनी एका निवेदनात म्हटले आहे. रमेश म्हणाले की, सध्या सुरू असलेल्या तिसऱ्या टप्प्यात १२ राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधील ३६.०६ कोटी मतदारांपैकी ६.१८ कोटी मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. एसआयआरच्या पहिल्या दोन टप्प्यांत ७.८ कोटी नावे वगळण्यात आली होती; हे प्रमाण एसआयआर-पूर्व मतदार याद्यांच्या तुलनेत १३ टक्के इतके होते. तिसऱ्या टप्प्याची सुरुवात २०२६ च्या मध्यावर १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये झाली आहे. अशा प्रकारे, तब्बल ३२ टक्के (किंवा दर तीनपैकी एका) मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत किंवा त्यांच्या नावांवर वगळले जाण्याचा धोका आहे. निवडणूक आयोगाने सादर केलेल्या आकडेवारीनुसार, यादीतून वगळण्यात आलेले मतदार आणि वगळले जाण्याचा धोका असलेल्या मतदारांचे एकत्रित प्रमाण दिल्लीमध्ये ५३.७३ टक्के, चंदीगडमध्ये ५२.५८ टक्के, तेलंगणामध्ये ४८.९० टक्के, झारखंडमध्ये ३९.५७ टक्के, हरियाणामध्ये ३७.५ टक्के, उत्तराखंडमध्ये ३५.७१ टक्के, मेघालयामध्ये ३५.३६ टक्के, महाराष्ट्रामध्ये ३३.८८ टक्के, कर्नाटकमध्ये २७.६ टक्के, ओडिशामध्ये २३.६७ टक्के, आंध्र प्रदेशमध्ये २१.१७ टक्के आणि पंजाबमध्ये १५.२३ टक्के इतके होते.

------------

### पेट्रोलपंपांना डिजिटल पेमेंट शुल्कातून

निश्चित होते. पेट्रोलपंपचालकांना प्रतिलिटर मार्जिन मिळते. त्यामुळे व्यवहारावर आकारले जाणारे कोणतेही अतिरिक्त डिजिटल पेमेंट पेट्रोलपंप चालकांच्या मर्यादित मार्जिनवर थेट परिणाम करते, असे म्हटले आहे. दोन हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या यूपीआय व्यवहारावर पाच रुपयांचे शुल्क आकारण्याच्या प्रस्तावित व्यवस्थेमुळे पेट्रोलपंपचालकांवर आर्थिक भार वाढण्याची शक्यता असल्याचे संघटनेने नमूद केले आहे. पेट्रोलपंपचालकांनी यूपीआय, क्यूआर कोड, ईडीसी, पीओएस यंत्रणा, फ्लिप कार्ड या माध्यमातून डिजिटल व्यवहारांना सातत्याने सहकार्य केले आहे. देशात रोकडविरहित अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या सरकारच्या प्रयत्नांमध्ये पेट्रोलपंपांनीही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे डिजिटल पेमेंटची सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या पेट्रोलपंपचालकांवरच त्याचा आर्थिक भार टाकणे योग्य ठरणार नाही, असे संघटनेने म्हटले आहे.

----------------

### एसटीच्या ताफ्यात दाखल होणार २००

आराम बससेवेला पसंती देतात. वातानुकूलित सुविधा, आरामदायी आसनव्यवस्था, कमी प्रवास वेळ आणि रात्रीच्या प्रवासातील सुविधा यामुळे खासगी आराम बससेवेचा स्वतंत्र प्रवासी वर्ग निर्माण झाला आहे. या प्रवाशांना एसटीकडे आकर्षित करण्यासाठी केवळ पर्याय उपलब्ध करून न देता खासगी आराम बससेवेच्या तोडीची आधुनिक, विश्वासार्ह आणि प्रवाशांच्या अपेक्षा पूर्ण करणारी सेवा देण्याचे उद्दिष्ट एसटीने निश्चित केले आहे. २५० किलोमीटरपेक्षा अधिक अंतराच्या किमान पाच ते सहा तासांच्या प्रवासासाठी आरामदायी ४५ आसनी बसेस, तर रात्रीच्या लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी ३० किंवा ४५ शयनयान क्षमतेच्या बसेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे दिवसा तसेच रात्रीच्या प्रवाशांना त्यांच्या गरजेनुसार प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे. नव्या आराम बससेवेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रवाशांना डिजिटल पद्धतीने सहज आरक्षण करता येणार आहे. एसटीच्या अधिकृत ऑनलाईन आरक्षण व्यवस्थेबरोबरच खासगी डिजिटल ट्रॅव्हल प्लॅटफॉर्मवरूनही या बसेसचे तिकीट आरक्षित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा महामंडळाचा मानस आहे. त्यामुळे प्रवाशांना बसस्थानकावर येऊन तिकीट काढण्याची आवश्यकता राहणार नाही, असे सरनाईक म्हणाले.

------------

### वारकरी संप्रदायाची चौकट ओलांडल्याने

कसे योग्य आहेत' यावरच संपूर्ण कीर्तन केंद्रित केले. संत साहित्याचा आणि अभंगांचा आधार केवळ राजकीय व सामाजिक मागण्यांचे समर्थन करण्यासाठी घेतल्याचा आरोप आता वारकरी अभ्यासक आणि नेटकऱ्यांकडून केला जात आहे. या कीर्तनांचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर संबंधित कीर्तनकारांना तीव्र विरोधाला सामोरे जावे लागत आहे. वारकरी संतांच्या कोणत्या अध्यायात किंवा अभंगात अमुक एका समाजाला आरक्षण मागण्याचे दाखले दिले आहेत? संतपीठाचा उपयोग आंदोलनाचे व्यासपीठ म्हणून करणे कितपत योग्य आहे? कीर्तनाची पवित्र गादी ही सर्व समाजासाठी असते की विशिष्ट आंदोलनासाठी? असे थेट प्रश्न नेटकरी आणि वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ विचारवंत उपस्थित करत आहेत. या थेट प्रश्नांमुळे अनेकांची बोलती बंद झाली आहे. जात आरक्षण राजकारण हे वारकरी संप्रदायांमध्ये कधीपासून सुरू झाले अन असे झाले तर काही मोजक्या लोकांमुळे वारकरी संप्रदायाकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलायला वेळ लागणार नाही आणि प्रत्येक किर्तनकारकडे जात म्हणून पाहिले जाईल त्याचे परिणाम किर्तनकारालाच भोगावे लागतील कारण भक्त तुम्हाला विसरतील पण संतश्रेष्ठ विठ्ठल रुक्माई संत जनाई संत ज्ञानेश्वर संत चोखोबा संत मुक्ताई संत तुकोबा संत चोखोबा संत नगदणारायन संत भगवान बाबा संत बाळू मामा यांना विसरणार नाही खरंतर कीर्तनकारांनी राजकारण समाजकारण याच्या व्यासपीठापासून दूरच राहिले पाहिजे पण सांगणार कोण? हा मोठा प्रश्न आहे.

--------------

cmyk

cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. २१ सप्टेंबर २०२६



## थोडक्यात

### जिल्हास्तरीय हँडबॉल स्पर्धेत अनिषा ग्लोबल स्कूलच्या मुलींना विजेतेपद

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय हँडबॉल स्पर्धेत अनिषा ग्लोबल स्कूलच्या १४ वर्षांखालील मुलींच्या संघाने दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. या उल्लेखनीय यशामुळे संघाची विभागीय स्तरावरील हँडबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.




संघातील खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले. विजयी संघात आराध्या जाधव, श्रिषा जाधव, श्रावणी मोरे, समृद्धी घुले, तहरिम तांबोळी, समीक्षा गळगटे, जिनल बाफना, ईश्वरी कर्डीले, माहेश्वरी तवले, काव्या राऊत, परिणीती पडोळे, श्रेया मोहळकर, समीक्षा भवर आणि स्वरा होळकर यांचा समावेश आहे.

संघाला क्रिडा शिक्षक श्री. अजीम शेख यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल देवस्थानचे अध्यक्ष श्री. सुरेश अण्णा धस, शाळेच्या कार्यकारी संचालिका सौ. प्राजक्ता धस, प्राचार्य श्री. अविनाश राऊत व कु. हरजोतकौर जोगी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व विभागीय स्तरावरील स्पर्धेतही संघाने अशीच उल्लेखनीय कामगिरी करावी, अशा शुभेच्छा दिल्या.

### आपला गणेश मंडळ आयोजित कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्न; चापडगाव प्रीमियर लीगचे वर्चस्व

जातेगाव । प्रतिनिधी

स्थानिक क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी आपला गणेश मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली भव्य कबड्डी स्पर्धा नुकतीच मोठ्या उत्साहात पार पडली. परिसरातील क्रीडाप्रेमींचा उदंड प्रतिसाद आणि खेळाडूंचा अटीतटीचा सामना या स्पर्धेचे मुख्य वैशिष्ट्य ठरले. स्पर्धेचे उद्घाटन मा. मनोज निलंगेकर साहेब यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. क्रीडांगणावर खेळाडूंना मार्गदर्शन करताना निलंगेकर साहेब म्हणाले की, क्रीडा प्रकारांमुळे तरुणांमध्ये शिस्त आणि संघभावना वाढीस लागते. ग्रामीण व स्थानिक पातळीवरील अशा स्पर्धांमुळेच भविष्यातील राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तयार होतात.स्पर्धेचा अंतिम निकाल: मैदानावर रंगलेल्या चुरशीच्या सामन्यांमध्ये खेळाडूंनी दाखवलेल्या चपळाईने आणि उत्कृष्ट पकडींनी प्रेक्षकांची मनं जिंकली. अंतिम फेरीतील निकालात पुढील प्रमाणे यश मिळाले, प्रथम क्रमांक (विजेता): चापडगाव प्रीमियर लीग, द्वितीय क्रमांक (उपविजेता): शारदा अकॅडमी कबड्डी, तृतीय क्रमांक: यमाई कबड्डी दानशूर बक्षीसदात्यांचे सहकार्य: स्पर्धेतील विजेत्या संघांना पारितोषिक आणि ढाल देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मा. महादेव अण्णा धोंडरे यांच्या सौजन्याने देण्यात आले, द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मा. ड. ज्ञानेश्वर खाडे यांनी दिले, तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मा. दत्ताभाऊ वाघमारे यांच्या वतीने देण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी आपला गणेश मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. परिसरातील हजारो क्रीडारसिकांनी उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह द्विगुणित केला.

# गेवराईत चंदन तस्करी करणारे दोघे जेरबंद

## १ लाख १३ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

चंदनाच्या झाडांची चोरी करून बेकायदेशीररीत्या तस्करी करणाऱ्या दोन आरोपींना गेवराई पोलिसांनी सापळा रचून रंगेहाथ पकडले. या कारवाईत पोलिसांनी सुमारे १ लाख १३ हजार २५० रुपये किमतीचे चंदनाचे लाकूड, दुचाकी आणि झाड तोडण्याचे साहित्य जप्त केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १९ सप्टेंबर रोजी गेवराई पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली होती की, राजपिंपरी शिवारात दोन इसम चोरी केलेल्या चंदनाच्या झाडांच्या लाकडांची कटिंग करत आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचासमक्ष राजपिंपरी ते मन्यारवाडी शिवार रस्त्यावर छापा टाकला. त्यावेळी दोघे जण मोटारसायकलवरून पळून जाण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले.

चौकशी केली असता त्यांनी आपली नावे विठ्ठल बंसी गरड आणि शहादेव अर्जुन डेंगळे (दोघेही रा. राजपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड) अशी असल्याचे सांगितले. त्यांची जागेवरच झडती घेतली असता त्यांच्याकडून एका गोणीत भरलेले १६ किलो




५०० ग्रॅम वजनाचे ७ नग ओलसर चंदनाचे लाकूड (किंमत अंदाजे रु. ८२,५००/-), झाड तोडण्याचे साहित्य तसेच गुन्ह्यात वापरलेली काळ्या रंगाची डिस्कव्हर मोटारसायकल (क्र. MH-23----5260, किंमत अंदाजे रु. ३०,०००/-) असा एकूण १ लाख १३ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ५६४/२०२६ नुसार कलम ३०३(२), ३(५) BNS सह भारतीय वन अधिनियम कलम ४१, ४२, महाराष्ट्र वन अधिनियम २०१४ कलम ३१/८२ आणि महाराष्ट्र झाडे तोडणे अधिनियम १९६४ च्या कलम ४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार सुंदर राठोड करत आहेत.सदर कारवाई बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, पोलीस उपनिरीक्षक रोकडे, पोलीस हवालदार रवींद्र राऊत, सुंदर राठोड, पोलीस कॉन्स्टेबल महेंद्र ओव्हाळ, रामेश्वर काकडे व चालक पोलीस हवालदार सांगळे यांच्या पथकाने केली आहे.

# पोक्सो प्रकरणात आरोपीची निर्दोष मुक्तता

**अॅड. तेजस नेहरकर यांचा प्रभावी युक्तिवाद; साक्षी–पुराव्यांच्या चिकित्सेनंतर न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल**

बीड । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील अंमळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल झालेल्या पोक्सो प्रकरणात उपलब्ध साक्षी-पुरावे, कागदपत्रे तसेच बचाव पक्षाने मांडलेल्या कायदेशीर बाबींची सखोल चिकित्सा केल्यानंतर न्यायालयाने आरोप सिद्ध होत नसल्याचा निष्कर्ष नोंदवत माननीय जिल्हा न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली आहे. हा निकाल १९ सप्टेंबर २०२६ रोजी दिला. या प्रकरणात आरोपीच्या वतीने ड. तेजस एस. नेहरकर यांनी प्रभावीपणे बाजू मांडली.

या बाबत अधिक माहिती अशी की बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील अंमळनेर पोलीस ठाण्यात गु.र.क्र. १५१/२०२३ अन्वये ९ डिसेंबर २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. यामध्ये ६ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास पीडितेच्या घरासमोर घटना घडल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणात भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४, ३५४(ड), ५०६ तसेच पोक्सो कायदा, २०१२ मधील कलम ८ व १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी ९ डिसेंबर २०२३ रोजी आरोपीला अटक केली होती.



खटल्याच्या सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाने सादर केलेले साक्षी-पुरावे व कागदपत्रे आणि बचाव पक्षाचा युक्तिवाद यांची न्यायालयीन पातळीवर सविस्तर चिकित्सा झाली. बचाव पक्षातर्फे ड. तेजस एस. नेहरकर यांनी उपलब्ध पुराव्यांतील बाबी, साक्षीदारांचे जबाब आणि कायदेशीर मुद्दे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच प्रकरणातील फिर्यादी व आरोपी यांच्यात झालेल्या विवाहाचा संदर्भ आणि संबंधित न्यायालयीन तत्त्वांचा आधार घेत बचाव पक्षाची बाजू मांडली. अॅड. तेजस एस. नेहरकर यांनी या प्रकरणातील कागदपत्रे, साक्षी आणि कायदेशीर तरतुदींचा बारकाईने अभ्यास करून त्यांनी न्यायालयासमोर बचाव पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडली. त्यामुळे

आरोप सिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेला पुराव्यांचा निकष पूर्ण होत नसल्याचा युक्तिवाद ही न्यायालयासमोर अॅड. तेजस नेहरकर यांनी केला. त्यानंतर माननीय जिल्हा न्यायालयाने संपूर्ण प्रकरणाचा विचार करून व एडवोकेट तेजस नेहरकर यांनी सादर केलेला बचाव ग्राह्य धरून या प्रकरणातील आरोपीची निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात अॅड .तेजस एस.नेहरकर यांना अॅड. गौतम जी. नाईकवाडे, अॅड. इम्रान पटेल, अॅड. रविराज व्ही. राठोड, अॅड. संतोष शेंडगे, अॅड. शिकंदर शेख आणि अॅड. दत्ता खांडेकर यांचे सहकार्य लाभले.

## पान ६ वरुन...

### संशयित तांदूळ प्रकरण ट्रक चालक

या संदर्भात ट्रक चालक आणि मालक यांना पोलिसांनी चौकशीसाठी निरोप दिला. मात्र या दोघांनीही या चौकशीला बगल दिल्याने नक्कीच दाल मे कुछ काला है अशी शक्यता निर्माण झाली आहे. विशेषता पोलिसांनी चौकशीसाठी बोलावूनही येत नाहीत याचाच अर्थ हा तांदूळ नक्कीच शासकीय वितरण व्यवस्थेमधील असावा. हा तांदुळ पाटोदा कडून केज मार्गे हैदराबाद कडे जात असावा अशी शंका आहे. विशेष म्हणजे हा ट्रक ट्रान्सपोर्ट वरून निघाला की खाजगी मालकीचा आहे? याचाही तपास अद्याप झालेला नाही. चौकशीसाठी चालक आणि मालक येत नसल्यामुळे ही चौकशी अद्यापही गुलदस्त्यात आहे. तेव्हा नेकनूर पोलिसांनी आता पोलिसी खाक्या दाखवून या प्रकरणातील खरे काय आणि खोटे काय आहे. जनतेसमोर आणावे नेकनूर पोलीस कार्यक्षम आहेत हे आजपर्यंत दिसून आले आहे.या प्रकरणात देखील पारदर्शकता ठेवून चौकशी केली तर सत्य समोर येईल. तेव्हा पोलिसांनी आता खाक्या दाखवण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.

### लोकनेते सुंदरराव सोळंके

किती दिवस चालेल आणि किती गाळप होईल, याचा अंदाज बांधणे सध्या कठीण आहे.मात्र, इतर कारखान्यांच्या तुलनेत आपल्या कारखान्याने आजपर्यंत कायमच शेतकरी हिताला प्राधान्य देत अधिकचा भाव देण्याची परंपरा जपली आहे आणि ही परंपरा यापुढेही कायम राहील, याबाबत सभेत शेतकरी बांधवांना आ.प्रकाश सोळंके आश्वस्त केले.यावर्षीचा ऊसदर मागील वर्षाच्या एफ आर पी प्रमाणे द्यायचा की चालू वर्षाच्या एफ आर पी प्रमाणे,याबाबत शासनाचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. मात्र,मागील वर्षाच्या एफ आर पी प्रमाणे दर निश्चित करण्याचा निर्णय झाल्यास २,९७० प्रति टन या दराने ऊसदर देत, त्यामध्ये नेहमीप्रमाणे काही ना काही वाढ करून शेतकरी बांधवांना अधिकचा भाव देण्याचा आमचा प्रयत्न राहील.शेतकऱ्यांचा विश्वास आणि त्यांच्या कष्टाचा सन्मान हीच कारखान्याची कायमची भूमिका असून, शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत पुढील वाटचाल करण्याचा निर्धार यावेळी आ.प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केला आहे.यावेळी धौर्यशील सोळंके, चेअरमन विरेंद्र सोळंके, व्हाईस चेअरमन जयसिंग सोळंके, कार्यकारी संचालक, कारखान्याचे संचालक,सभासद, अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थित होती

### काकूंच्या आशीर्वादानेच

देऊन गौरव करण्यात आला.

व्यासपीठावर ज्येष्ठ विधिज्ञ ड.विवेकानंद सानप, ज्येष्ठ नेते अरुण डाके, नवगण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.किशोर काळे, विनायक युवक कल्याण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र पवार, रायमोहाचे सरपंच सुभाष क्षीरसागर, संचालक आमेर सिद्दीकी, गणेश वाघमारे, नगरसेवक ड.नागेश तांबारे, राणा चव्हाण, शुभम धूत, राहुल गुरखुदे, सनी माने, प्रशासकीय अधिकारी डॉ. व्ही. टी. देशमाने, डॉ. सुधाकर गुट्टे, पतसंस्थेचे अध्यक्ष बी. एस. चवार, उपाध्यक्ष शाम डाके, सरपंच अमोल बागलाने, महादेव खोसे, अरुण बोंगाने, भाऊसाहेब सुरवसे, शुभम कातांगळे, उद्धव म्हेत्रे, डॉ. किशोर वरपे, सुशील जाधव, आदित्य संभाने, संजय होळकर, प्राचार्य शिवानंद क्षीरसागर, आबासाहेब हंगे, डॉ.बळीराम राख, डॉ.पंडित खाकरे आदींसह संस्थेचे संचालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळासाहेब चवार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.पांडुरंग सुतार यांनी केले, तर आभार उपाध्यक्ष श्याम डाके यांनी मानले. यावेळी विद्यार्थ्यांसह पतसंस्थेचे पदाधिकारी, सभासद उपस्थित होते.

### व्यापारी गणेश मंडळाच्या

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी व्यापारी गणेश मंडळाचे अध्यक्ष व्यंकटेश कुल्थे, उपाध्यक्ष बजरंग कटारे, सचिव गणेश कटारे, खजिनदार परमेश्वर ठोंबरे, सुर्यकांत खांडेकर, यश गौंडर, ईश्वर कांबळे, ओमकार कुलकर्णी, चैतन्य गौंडर, प्रशांत जैन सह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले. रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे तसेच शिबिरासाठी सहकार्य करणाऱ्या नागरिकांचे मंडळाच्या वतीने आभार मानण्यात आले.

### शिक्षकांच्या मागण्यांपदरात

मधील निर्धारित सूत्राप्रमाणे शासननिर्णय,शासनाच्या चुकीमुळे १२,१५५ व २४ या शासननिर्णयान्वये ३० दिवसांच्या आत शासनस्तरावर त्रुटीपात्र ठरलेल्या शाळांना निधीसह समान टप्पावाढ करणे,सन २०१८-१९,२०२२-२०२३ पटसंख्येच्या अटीमुळे टप्पावाढीपासून वंचित असलेल्या शाळांना नमुद शैक्षणिक वर्षाऐवजी त्यापुढील व अथवा मागील शैक्षणिक वर्षाची पटसंख्या ग्राह्य धरत टप्पावाढ करणे, यासह इतर अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत शिक्षक समन्वय संघाचे निर्धार आंदोलन मागे घेण्यात येणार नाही,अशी भूमिका व्यक्त करण्यात आली आहे.

प्रमुख मागण्या:-१) प्रतिवर्षी २०% टप्पावाढ मिळणे.२) त्रुटीपात्र शाळांना समान टप्पा मिळणे.३) पटसंखेमुळे अपात्र शाळांना पुढील वर्षाची संख्या ग्राह्य धरून अनुदान देणे.४) NPS/UPS अनुदान टप्प्यानुसार कपात करणे.

५) उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयांच्या संच मान्यतेचे निकष पूर्ववत ठेवणे. ६) अंशत: अनुदानित/ विना अनुदानित सेवानिवृत्त शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सन्मान निवृत्ती वेतन मिळणे.७) अंशत: अनुदानित कर्मचारी यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती मिळणे.८) शिक्षण आयुक्त पुणे स्तरावरील पात्र अघोषित शाळांना २०% अनुदान मिळणे.

## माकेगावच्या संजय वाघमारे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनुसूचित जाती विभागाच्या सरचिटणीसपदी निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

माकेगाव, ता. अंबाजोगाई येथील काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते संजय वाघमारे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाच्या सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे अंबाजोगाई तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

संजय वाघमारे यांनी विद्यार्थी काँग्रेस (छडणख), युवक काँग्रेस, तालुका काँग्रेस कमिटी तसेच राज्य समन्वयक अशा विविध पदांवर काम करत पक्ष संघटनेत योगदान दिले आहे. स्वर्गीय माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच खासदार वर्षाताई गायकवाड, आमदार अमित भैय्या देशमुख, दिलीपराव देशमुख, माजी मंत्री



विजय वडेट्टीवार, बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष वसंत आबा मोरे आणि विद्याधर काका पांडे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी काँग्रेसच्या विचारांशी एकनिष्ठ राहून कार्य केले आहे.

या निवडीबद्दल संजय वाघमारे यांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, अनुसूचित जाती विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र पाल गौतम, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि अनुसूचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष अनिरुद्ध वनकर यांचे आभार मानले. पक्षाने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत आगामी काळात काँग्रेसची संघटनात्मक ताकद वाढविणे, कार्यकर्त्यांना जोडणे आणि सामाजिक न्यायाचा आवाज अधिक बुलंद करणे हा आपला संकल्प असल्याचे संजय वाघमारे यांनी सांगितले. संजय वाघमारे यांच्या निवडीबद्दल माकेगावसह अंबाजोगाई तालुक्यातील काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# पाटोद्यात खरिपाची ईपीक पाहणी अॅप बंद

**जिल्हाधिकारी यांनी लक्ष द्यावे शेतकरी वर्गाची मागणी**

पाटोदा । प्रतिनिधी

माझी शेती माझा सातवारावर पिक पेरा मीच नोंदविणार या योजने अंतर्गत

शेतकऱ्यांचे ई पिक नोंदणीचे अॅप पाटोदा येथील काही सर्वे नंबरचे बंद असल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना खरीप २०२६ चा पिक पेराची नोंद आपल्या सातबारावर करता येईना ई पिक पाहणी करण्यासाठी शासन शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहित करत आहे याचा प्रचार सुद्धा प्रशासकीय पातळीवर होत आहे शेतकऱ्याला इ पीक नोंद करण्याकरता मदतनीस म्हणून यावर्षी प्रशासनाने सहाय्यकाच्या नियुक्ती करण्यात आलेले आहेत

शेतकरी हे नेमलेल्या सहाय्यक कडुन आपली शेतातील पीक पेरा सातवारा नोंदवू शकतो मात्र काही शेतकरी सहाय्यकाकडे इ पीक पाहणी करण्याकरिता गेले असता पाटोदा येतील अनेक सर्वे नंबरची ई पीक पेरा नोंद होऊ शकत नाही कारण इ पिक नोंदणीचे प बंद आहे त्यामुळे अनेक शेतकऱ्यांची इ पीक पाहणी होत नाही यामुळे शेतकरी पिकाची सातबारावर नोंद करण्यासंदर्भात अडचणीत आला आहे

शेतकऱ्याच्या शेतातील खरीपिकाची नोंद सातबारा वर न झाल्यास शेतकऱ्यांना

पीक विमा, पीक कर्ज तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागणार आहे याची जाण शेतकऱ्याला झालेली आहे पत्रकार अ कादर मकरानी यांनी सहाय्यकाचे प्रमुख ई पीक पाहणी करणारे यांच्याशी संपर्क साधला असता अॅप चालू करण्यासंदर्भात प्रयत्न चालू आहे असे सांगण्यात आले

जिल्हाधिकारी यांनी पाटोदा तालुक्यातील ई पीक पाहणी पेरा प संदर्भात लक्ष देऊन ईपीक पाहणीचे अॅप सुरळीत चालू करण्या साठी लक्ष द्यावे अशी शेतकरी वर्गाकडून मागणी होत आहे.

# आदर्श रुई गांवचे सरपंच अॅड. मयूर आंधळे यांनी मराठवाडा दिनी देशहितवादीची जोपासना केली

**ग्रामपंचायत व जिल्हा परिषद कार्यालयातील मुख्य ध्वजारोहण कार्यरत आर्मी सैनिकाच्या हस्ते संपन्न केला**

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील एकमेव पुनर्वसित गाव आदर्श रुई गावचे उच्चभूषित, कार्यशील, युवा सरपंच अॅड. मयूरभैया आंधळे यांच्या संकल्पनेमधून आणि मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून गावातच देशहितवादीची भावना जोपासत ग्रामपंचायत कार्यालय व जिल्हा परिषद शाळेतील मुख्य ध्वजारोहण कार्यरत असणारे आर्मीचे जवान व गावचे पहिले फौजी यांच्या हस्ते संपन्न करून त्यांचा भव्य दिव्य असा सत्कार देखील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्यातील बालाघाटाच्या पर्वत रांगेत पुनर्वशीत गाव म्हणून आदर्श रुई गावचा नामउल्लेख केला जातो. अॅड. मयूरभैया आंधळे यांच्या हाती येथील ग्रामपंचायतची सत्ता आल्यापासून गावचा विकास कसा साधला जातो, याचे ताजे उदाहरण मयूर आंधळे यांनी सर्वांसमोर ठेवले आहे. त्यांच्या संकल्पनेतूनच गावचा विकास जिल्ह्यासह राज्याच्या पटलावर उमटला आहे. विकासाची दूरदृष्टी, लोकहिताचे विचारधारा, शासनातील विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे कार्य व त्याची सखोल माहिती पोहोच करण्याचे कार्य देखील ग्रामपंचायतीच्या माध्यमातून केले जात आहे. हाच वसा आणि वारसा घेऊन या गावचे आदर्श उच्चभूषित कार्यत्पर, कर्तव्यनिष्ट, युवा सरपंच अॅड. मयूरभैया आंधळे यांनी तेवट ठेवले आहे. म्हणूनच दि. १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून रुई गावचे पहिले देशसेवा करणारे आर्मी जवान शिवराज प्रभाकर आंधळे कर्तव्यावरून पहिल्यांदाच रजेवर आणि गावाकडे आल्याने त्यांचा मान, सन्मान करत ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेच्या शाळेच्या मुख्य आर्मी जवान यांच्या हस्ते तिरंगी ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. तसेच त्यांनी देशसेवेसाठी घेतलेले व्रत्त हे देखील अभिमानास्पद असल्याने त्यांचा गावकऱ्यांच्या वतीने भव्य-दिव्य असा सत्कार देखील केला. हि सर्व संकल्पना गावचे उच्चभूषित सरपंच अॅड.





मयूरभैया आंधळे यांच्या पुढाकारातून साकार झाली आहे. गावच्या विकासासोबतच गावची लोकहितवादी जोपासना देखील त्यांच्या माध्यमातून होत आहे. तसेच यास अन्य विविध वेगवेगळे उपक्रम राबवून गावकऱ्यां समोर आदर्श ठेवला असल्याने सरपंच मयूर आंधळे यांचे सर्वत्र कौतुक देशील केले जात आहे. तर या कार्यक्रमाला गावचे उपसरपंच श्री. सुधाकर लोंढे पाटील, ग्रामपंचायत सदस्य श्री. अशोक विष्णु लोंढे, श्री. कृष्णा दत्तु खाडे, श्री. बाबासाहेब धर्मराज आंधळे, गावचे नवनियुक्त पोलीस पाटील श्री. अशोक लोंढे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. कृष्णा भैया आंधळे, उपाध्यक्ष श्री. संग्राम आंधळे व सर्व सदस्य, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री. शंकर पाटील लोंढे, श्री. रघुबप्पा आंधळे, श्री. सोनाजी भाऊ लोंढे, श्री. बापुराव गवळी, श्री. मधुकर आंधळे, श्री. बाळुभाऊ आंधळे, श्री. प्रभाकर आंधळे, श्री. बाबासाहेब खाडे महाराज, श्री. सदाशिव आंधळे, श्री. गोरख आंधळे, श्री. विकास आंधळे, श्री. बिबिशन आंधळे, श्री. लालासाहेब लोंढे, लोकपत्रकार श्री. बप्पासाहेब भांगे, श्री. दादाभाई शेख यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गाव माझे मी गांवाचा – अॅड. मयूर आंधळे**

आदर्श रुई गावाने देखील माझ्यासह माझ्या आंधळे परिवारावर खूप मोठे निस्वार्थी प्रेम केले आहे.या प्रेमाची उतराई व रुई गावाप्रती माझी निष्ठा म्हणून मी गावचा व गाव माझे या उद्दिष्टाला समोर ठेवून मागील कालखंडात काम केले आहे व पुढील काळात देखील काम करणार आहे या सह अनेक उपक्रम ग्रामस्थांच्या साक्षीने भव्यदिव्य केले आहे. इथून पुढे देखील गावच्या विकासासाठी व लोकहितवादी निर्णयामध्ये मागे हटणार नाही अशी प्रतिक्रिया रुई गावचे आदर्श उच्चभूषित, कार्यतत्पर व कार्यनिष्ठ युवा सरपंच अॅड. मयूरभैया आंधळे यांनी या कार्यक्रमादरम्यान व्यक्त केले आहे.

cmyk

# वीज अपघातात पशुधन मृत्यू पावल्यास आता ५० हजारांपर्यंत नुकसानभरपाई; महावितरणकडून रकमेत वाढ




पुणेः महावितरणच्या विद्युत वाहिन्या किंवा अन्य विद्युत उपकरणांमुळे झालेल्या अपघातात पशुधनाचा मृत्यू झाल्यास शेतकरी आणि पशुपालकांना मिळणाऱ्या नुकसान भरपाईत भरीव वाढ करण्यात आली आहे.

नव्या निर्णयानुसार गाय, म्हैस, बैल, घोडा, गाढव यांसारख्या मोठ्या जनावरांचा वीज अपघातात मृत्यू झाल्यास आता ५० हजार रुपये, तर शेळी, मेंढी आणि वासरू यांसाठी ५ हजार रुपये नुकसान भरपाई मिळणार आहे.महावितरणने १६ सप्टेंबर रोजी जारी केलेल्या प्रशासकीय परिपत्रकानुसार ही सुधारित मदत त्याच दिवसापासून लागू करण्यात आली आहे. पशुधनाच्या वीज अपघाती मृत्यूच्या प्रकरणात यापूर्वी २००८ च्या परिपत्रकानुसार नुकसान भरपाई दिली जात होती.वाढती महागाई आणि पशुधनाच्या किमती लक्षात घेऊन भरपाईच्या रकमेत सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महावितरणचे मुख्य महाव्यवस्थापक भूषण कुलकर्णी यांच्या स्वाक्षरीने १६ सप्टेंबर रोजी हे प्रशासकीय परिपत्रक जारी करण्यात आले. वीज अपघातात जनावराचा मृत्यू झाल्यानंतर नुकसान भरपाईचा प्रस्ताव तयार करणे आणि मदत वितरित करण्याची कार्यपद्धती बदललेली नाही. या प्रकरणातील उर्वरित प्रक्रिया ३ जून २०११ रोजीच्या संबंधित परिपत्रकातील तरतुदींनुसारच केली जाणार आहे.

नव्या परिपत्रकानुसार केवळ नुकसान भरपाईच्या रकमेत सुधारणा करण्यात आली आहे. शेतालगत जाणाऱ्या विद्युत वाहिन्या, तुटलेल्या तारा तसेच विद्युत उपकरणांमुळे पशुधनाला धोका निर्माण होतो. पावसाळ्यात वादळी वाऱ्यामुळे वीजतारा तुटणे किंवा विद्युत उपकरणांमध्ये बिघाड होण्याच्या घटनांमुळे हा धोका अधिक वाढतो.

चरताना किंवा शेतात कामाच्या ठिकाणी विद्युत तारांचा संपर्क झाल्याने जनावरे दगावल्यास पशुपालकांचे मोठे आर्थिक नुकसान होते. अशा वेळी वाढीव भरपाईमुळे संबंधितांना आर्थिक आधार मिळणार आहे.

## कमी खर्चात आणि कमी दिवसांत हमखास नफा देणारे पीक – मटार!



मटार लागवड हा कमी कालावधीत आणि कमी खर्चात शेतकऱ्यांना हमखास नफा मिळवून देणारा एक उत्तम कोरडवाहू व बागायती व्यवसाय आहे. मटारच्या पिका मुळे जमिनीचा सुपीकपणा वाढण्यासही मदत होते. मटारची यशस्वी लागवड करण्यासाठी खालील माहिती उपयुक्त ठरेल

हवामान आणि जमीन :हवामान: मटार हे प्रामुख्याने थंड आणि कोरड्या हवामानातील पीक आहे. बियांच्या उगवणीसाठी २२ओउ आणि पिकाच्या उत्तम वाढीसाठी १५ओउ ते १८ओउ तापमान आदर्श मानले जाते. जास्त उष्णतेमुळे फुलगळ होते. जमीन: मध्यम ते भारी, उत्तम निचरा होणारी आणि सुपीक जमीन योग्य ठरते. जमिनीचा सामू (कि) ६ ते ७.५ च्या दरम्यान असावा.

लागवडीचा हंगाम :रब्बी हंगाम (सर्वोत्तम): १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर हा काळ मटार लागवडीसाठी अत्यंत योग्य आहे. खरीप हंगाम: डोंगराळ किंवा कमी तापमानाच्या भागात जून-जुलैमध्येही लागवड केली जाते.

सुधारित जाती :लवकर येणाऱ्या जाती (६० दिवसांत): असौजी, अर्केल, मटार अगेता. मध्यम कालावधीत येणाऱ्या जाती (७५-८० दिवसांत): बोनव्हिला, जवाहर मटार-१, आझाद मटार-१.

लागवड पद्धत :पूर्वमशागत: जमीन १-२ वेळा चांगली नांगरून भुसभुशीत करावी. हेक्टरी १० ते १५ टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. बियांचे प्रमाण: लवकर येणाऱ्या जातींसाठी हेक्टरी ८० ते १०० किलो आणि उशिरा येणाऱ्या जातींसाठी ६० ते ७० किलो बियाणे लागते. बीजप्रक्रिया: पेरणीपूर्वी बियाणास रायझोबियम (२५० ग्रॅम प्रति १० किलो बियाणे) आणि बुरशीनाशकाची प्रक्रिया नक्की करावी. अंतर: दोन ओळीत ३० सेमी आणि दोन रोपांत ५ ते १० सेमी अंतर ठेवून सपाट वाफ्यात किंवा सरी-वरंब्यावर पेरणी करावी.खत आणि पाणी व्यवस्थापन :खत व्यवस्थापन: मटार हे शेंगावर्गीय पीक असल्याने याला नत्राची गरज कमी असते. पेरणीच्या वेळी २० ते ३० किलो नत्र, ६० किलो स्फुरद आणि ५० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. पाणी व्यवस्थापन: पेरणीनंतर लगेच पहिले हलके पाणी द्यावे. त्यानंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. फुलकळ्या निघताना आणि शेंगा भरताना पिकाला पाण्याचा ताण पडू देऊ नये.

काढणी आणि उत्पादन : काढणी: शेंगांचा रंग गडद हिरवा असताना आणि दाणे मऊ व पूर्ण भरलेले असतानाच हाताने तोडणी करावी. शेंगा जास्त जून झाल्यास चव खराब होते. उत्पादन: हिरव्या शेंगांचे सरासरी उत्पादन प्रति हेक्टरी ७ ते १० टन मिळते.

## २ लाख रुपये प्रति किलो दराने विकली जाते मशरूमची 'ही' जात लागवड केल्यास व्हाल करोडपती!



शेतकरी अनेक प्रकारच्या मशरूमची लागवड करतात, ज्याची किंमत प्रति किलो २५० ते ५०० रुपये आहे. याच्या लागवडीतून शेतकऱ्यांना भरपूर नफाही मिळत आहे. पण, अशी एक मशरूम जात आहे, ज्यांची किंमत हजारो नाही तर लाखो रुपये आहे. या जातीच्या मशरूमची लागवड सुरू करून एखादी व्यक्ती करोडपती सुद्धा बनू शकते. विशेष म्हणजे शेतकरी या मशरूमची लागवड लॅबमध्ये करू शकतात. आम्ही ज्या मशरूम बद्दल बोलत आहोत त्याचे नाव आहे 'कीडा जडी' मशरूम. या मशरूमचे शास्त्रीय नाव कॉर्डिसेप्स सायनेन्सिस असून हे यारसागुंबा वाया नावाने सुद्धा ओळखले जाते

'कीडा जडी' मशरूमचे फायदे आणि उपयुक्तता :कीडा जडी मशरूममध्ये अनेक औषधी गुणधर्म आढळतात. हा मशरूम कर्करोग, मूत्रपिंडाचे आजार आणि श्वसनाच्या गंभीर आजारांवर देखील उपयुक्त आहे. याच्या सेवनाने शरीराला अनेक प्रकारची जीवनसत्त्वे, प्रथिने आणि इतर पोषक तत्त्वे मिळतात. यामुळे तुमचे शरीर निरोगी आणि चमकदार राहते. हा मशरूम एक शक्तिशाली ऊर्जा बूस्टर म्हणून कार्य करते. त्याचा वापर विशेषतः पंचतारांकित हॉटेल्स आणि व्हीआयपी लोक करतात. हा मशरूम केशरसारखा दिसतो. आणि पाण्यात टाकल्यावर पाण्याचा रंग पिवळा होतो. याचा उपयोग ऊर्जा वाढवणारे पेय म्हणून केला जातो. त्यामुळेच बाजारात या मशरूमचा दर दोन लाख रुपये किलो आहे.


कीडा जडी मशरूम महाग का आहे?

हे मशरूम महाग असण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्याची मर्यादित उपलब्धता. एका अंदाजानुसार आशिया खंडात या मशरूमचा व्यवसाय अंदाजे २०० कोटी रुपयांचा आहे. हा एक जंगली मशरूम आहे. त्याची कमी उपलब्धता आणि मोठ्या संख्येने ग्राहक यामुळे त्याचा दर खूपच जास्त आहे. हे अनेक रोगांवर जीवनरक्षकासारखे काम करतात. यामुळेच जगभरातील मोठे खेळाडू आणि पैलवान या मशरूमची भाजी आवडीने खातात. काही लोकांचा असा विश्वास आहे की ही भाजी खाल्ल्याने इंग्रजी औषधे आणि रसायनांचा शरीरावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही. त्यात असे औषधी गुणधर्म आहेत, जे आपल्याला शक्तिशाली बनवतात.लागवड कुठे आणि कशी करतात :वास्तविक, या मशरूमची लागवड फक्त चीन आणि तिबेटच्या थंड भागात केली जाते. ही जगातील सर्वात महागडी भाजी म्हणून ओळखली जाते. मशरूमची ही जात कृमीद्वारे वाढविली जाते, म्हणूनच याला कीडा जडी मशरूम (घशशवर गरवळ चींीहीा) असेही म्हणतात. परंतु लॅबमध्ये योग्य वातावरण निर्मिती करून सुद्धा या मशरूमची लागवड करता येते. श्री गंगानगर येथील तरुण शेतकरी डॉ. चरण सिंह यांच्या मते, या मशरूमच्या लागवडीसाठी १० ु १० खोलीची आवश्यकता आहे. ही खोली प्रयोगशाळा म्हणून वापरली जाऊ शकते. शेतकऱ्यांना ही प्रयोगशाळा विभागणी करावी लागते. ही प्रक्रिया महागडी असली तरी शेतकऱ्याला त्यात सात ते आठ लाख रुपये गुंतवावे लागू शकतात. कारण त्याच्या लागवडीसाठी खूप आवश्यक उपकरणे लागतात.

उत्पन्न :हे मशरूम पीक वर्षातून ४ वेळा काढले जाऊ शकते. १० ु १० च्या खोलीतून दर तीन महिन्यांनी ५ किलो पीक घेतले जाते. अशा प्रकारे, या मशरूमचे एकूण २० किलो वार्षिक उत्पादन होऊ शकते.

कमाई :या शेतीमध्ये प्रयोगशाळेत ३ महिन्यांत ५ किलोपेक्षा जास्त मशरूम तयार करता येतात. अशा प्रकारे अवघ्या तीन महिन्यांत १० लाख रुपयांची कमाई होते. या मशरूमची वर्षातून ४ वेळा काढणी करता येते. अशा प्रकारे एकूण ४० लाख रुपयांची कमाई होईल.

# वाळलेला निकृष्ट चारा होईल गुणवत्तापूर्ण; करा या पद्धतींचा अवलंब!



निकृष्ट दर्ज्याच्या चाऱ्यामुळे पशुधनाची क्रयशक्ती, दूध उत्पादन यावर विपरीत परिणाम होत असतो. पशुधनास जो चारा खाण्यास दिला जातो, त्यात प्रामुख्याने हिरवा चारा, वाळलेला चारा, गव्हाचा, भाताचा, तुरीचा व ज्वारीचा भुसा, किंवा सोयाबीनचे काड, खुराक म्हणून पेंड यांचा समावेश केलेला आहे. परंतु हल्ली हिरवा वाळलेला चारा व पेंड इत्यादींच्या किमतीमध्ये खूप वाढ झालेली आहे. यासाठी उपलब्ध निकृष्ट चाऱ्यावरच प्रक्रिया करून ते गुणवत्तापूर्ण करता येते.

निकृष्ट चारा गुणवत्तापूर्ण करायचे उपाय आणि फायदे :

निकृष्ट वाळलेले गवत, गव्हाचे काड, सोयाबीनचा भुसा, वाळलेली वैरण साठवून ठेवून त्यावर युरियाची प्रक्रिया केल्यास निकृष्ट चारा पासून उत्कृष्ट व सकस चारा तयार करून जनावरांना देता येऊ शकतो. या प्रक्रियेतून चाऱ्याची पाचकता वाढते. तसेच चाऱ्याची गरज भागवता येते. पीक कापणीच्या वेळीच बदल घडविणे किंवा त्यात जैविक बदल घडविणे, काडा सोबत प्रथिने व ऊर्जा समृद्ध अन्न घटकांचा समावेश करून जनावरांना खाऊ घातल्यास अधिक फायदा होतो. उदा. २०० किलो वजनाच्या जनावराला आपण गव्हाच्या काडा सोबत चार किलो खुराक दोन किलो व हिरवे गवत दोन किलो दिल्यास अधिक फायदेशीर राहते. पशुधन जर दूध देणारे असेल तर काडाची कुट्टी सहा किलो व खुराक सहा किलो याप्रमाणे दिल्यास दूध उत्पादनामध्ये फायदा होतो. काडाला भौतिक प्रक्रिया केल्यास त्याची पचनशक्ती वाढते. उदा. चारा कुट्टी, काडाची कुट्टी केल्यास ते अधिक पचनीय होते. जनावरे ते अधिक प्रमाणात खातात तसेच कडबा कुट्टी केलेले काड जर पाण्यामध्ये रात्रभर भिजवले किंवा खाऊ घालण्याचा दोन तास अगोदर भिजवले तर जनावरे ते अधिक प्रमाणात खातात व खाल्ल्यानंतर अधिक ऊर्जा प्राप्त करून देतात. कमी प्रतिच्या चाऱ्यासोबत युरिया, मळी, क्षार मिश्रण एकत्रित करून त्याची वीट तयार केल्यास व ते चाटण म्हणून जनावराला उपलब्ध करून दिल्यास पशुधन निकृष्ट प्रतिचा चारा १५ ते ३० टक्के जास्त खातात. ज्यामुळे खुराकाची आवश्यकता कमी होते व पशुधनाच्या वजनामध्ये दैनंदिन वाढ होते. दुधाचे उत्पादन १५ ते २० टक्के वाढू शकते. निकृष्ट वाळलेले गवत, गव्हाचे काड, सोयाबीनचा भुसा, तसेच वाळलेली वैरण साठवून त्यावर युरियाची प्रक्रिया केल्यास निकृष्ट चारा पासून उत्कृष्ट व सकस चारा तयार करून जनावरांना देता येऊ शकतो. वाळलेल्या चाऱ्यामध्ये प्रथिनांचे प्रमाण एक ते दीड टक्के असते. युरिया प्रक्रिया केल्याने प्रथिनांचे प्रमाण आठ ते नऊ टक्के पर्यंत वाढते. चाऱ्याची पाचकता वाढते. चारा टंचाईच्या काळात टाकाऊ चारा उपयोगात आणून चाऱ्याची गरज भागवता येते.

वाळलेल्या चाऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठीचे साहित्य :१) वाळलेला चारा १०० किलोग्रॅम २) युरिया १.५ ते २ किलोग्रॅम ३) कमी प्रतिचा गूळ ३ किलोग्रॅम ४) क्षार मिश्रण १ किलोग्रॅम ५) खडे मीठ १ किलोग्रॅम ६) पाणी २० लिटर

चाऱ्यावर प्रक्रिया करण्याची पद्धत : वाळलेल्या चाऱ्याची कुट्टी करून घ्यावी. १०० किलो चाऱ्याच्या कुट्टीसाठी दीड ते दोन किलो युरिया २० लिटर पाण्यात विरघळून तयार झालेल्या द्रावणात १ किलोग्रॅम मीठ व ३ किलोग्रॅम गूळ मिसळून ढवळून एकजीव करावे. फरशीवर किंवा चवाळ्यावर चाऱ्याच्या कुट्टीचा पंधरा सेंटीमीटर थर घेऊन त्यावर द्रावण शिंपडावे, त्यावर क्षार मिश्रण टाकावे. कुट्टी वर - खाली करून चांगले मिसळावे. अशाप्रकारे कुटीचे एकावर एक थर देऊन त्यावर तयार केलेले द्रावण व क्षार मिश्रण टाकून मिसळावे. प्रक्रियायुक्त कुट्टी दाबून त्यातील हवा बाहेर काढून टाकावी. त्यावर प्लास्टिक कागद झाकून हवा बंद करावे. प्रक्रियायुक्त कुट्टी चारा २१ दिवसानंतर पशुधनास खाण्यात देण्यात यावा.

प्रक्रिया युक्त कुट्टी वापरताना घ्यावयाची काळजी : प्रक्रियेसाठी आवश्यक युरिया काळजीपूर्वक योग्य प्रमाणात मोजून घ्यावा. युरियाचे प्रमाण दीड व दोन टक्के पेक्षा जास्त नसावे. युरिया पाण्यात पूर्णपणे विरघळेल याची दक्षता घ्यावी. प्रक्रियायुक्त कुट्टी २१ दिवसानंतरच जनावरांना खाण्यास देऊ शकता. प्रक्रिया करण्याची जागा स्वच्छ टणक आणि पाऊस दलदल यापासून संरक्षित असावी. प्रक्रिया करते वेळेस गरज असल्यास तज्ज्ञांची मदत घ्यावी.

प्रक्रियायुक्त कुट्टी देण्याचे प्रमाण : प्रक्रियायुक्त कुट्टी सुरुवातीला जनावरांना एक ते दीड किलो प्रमाणात देऊन पंधरा दिवसापर्यंत वाढवत नेऊन एका जनावरास चार ते पाच किलोग्रॅम पर्यंत प्रतिदिन द्यावी. सहा महिन्यापेक्षा कमी वयाच्या वासरांना व रवंथ करणारे लहान प्राणी शेळ्या मेंढ्यांना देऊ नये.

प्रक्रिया कुट्टी वापरण्याचे फायदे : प्रक्रियायुक्त कुट्टी वापरल्यास होणारा खर्च कडबा पेक्षा कमी असतो, त्यामुळे चाऱ्यावरील खर्चात बचत होते. वाया जाणारे सुके गवत गावाचे काड याचा वापर केल्याने वैरणीची बचत होते. जनावरांच्या पोटातील खाद्याचे पचन करणाऱ्या जीवाणूंच्या संख्येत वाढ होते. त्यामुळे जनावरांची भूक वाढते व एकूण पचने पदार्थ अधिक प्रमाणात मिळतात. दूध उत्पादनात वाढ प्रक्रिया केलेले काड, गवत कडबा तुलनेत जास्त पौष्टिक असते. प्रक्रियेमुळे प्रथिनांचे प्रमाण ४ टक्के पर्यंत आणि एकूण पचनीय पदार्थाचे प्रमाण ४२ टक्के पासून ५६% पर्यंत वाढते, यामुळे दूध उत्पादनात वाढ होते.




### महत्वाच्या घटना

३०१ : ३०१ई.पूर्व : जगातील सर्वात जुने प्रजासत्ताक राष्ट्र सॅन मरीनो स्थापित झाले.
१७५२ : अमेरिकेत ग्रेगरीयन कॅलेंडरचा वापर सुरू झाला.
१९१६ : श्रीमती ॲनी बेझंट यांनी 'होमरुल लीग'ची स्थापना केली.
१९२१: बेल्जियम देशांत कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्यात आली.
१९३५: सर मॅल्कम कॅम्पबेल ताशी ३०० मैल पेक्षा जास्त जोरात ऑटोमोबाईल चालवणारे पहिले व्यक्ति झाले.
१९३९: जर्मन सम्राट हिटलर यांच्या पोलंड, ब्रिटन आणि फ्रान्सवर केलेल्या हल्ल्याला प्रती उत्तर म्हणून, सत्ता गाजविलेल्या राष्ट्राच्या दोन्ही मित्रपक्षांनी जर्मनीविरुद्ध युद्धाची घोषणा केली.
१९७१: कतारला स्वातंत्र्य मिळाले.
२००४: भारतीय पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि पाकचे अध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांच्यात या वर्षाच्या सुरुवातीच्या काळात नाजूक शांतता वाढत असताना, भारत आणि पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्यांनी दिल्ली येथे बैठक घेऊन शांततेचा करार केला.
२०१८: उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांनी लिहिलेल्या मुव्हिंग ऑन मुव्हिंग फोरवर्ड : ए इयर इन ऑफिस या पुस्तकाचे पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.
२०१९: भारतातील मध्य प्रदेश राज्यातील भोपाळ या शहरात सुरु असलेल्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये वरिष्ठ राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत ५० मीटर बटरफ्लाय प्रकारात वीर धवल खाडे व दिव्या सतीजा यांनी राष्ट्रीय विक्रमासह सुवर्णपदक पटकावले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६१७: मुघल सम्राट शाहजहां आणि त्यांची पत्नी मुमताज महल यांची दुसरी मुलगी रोशनारा बेगम यांचा जन्मदिन.
१८५५: पंत महाराज बाळेकुन्द्री – आध्यात्मिक गुरू (मृत्यू: १६ आक्टोबर १९०५)
१८६९: फ्रिट्झ प्रेग्ल – सेंद्रीय पदार्थांच्या पृथ्थक्करणासाठी १९२३ मधील रसायनशास्त्राचा नोबेल पुरस्कार मिळवणारे ऑस्ट्रियन शास्त्रज्ञ (मृत्यू: १३ डिसेंबर १९३०)
१८७५: फर्डिनांड पोर्श – ऑस्ट्रियन वाहन अभियंता (मृत्यू: ३० जानेवारी १९५१)
१९०५: नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ कार्ल डेव्हिड अँडरसनयांचा जन्म.
१९०५: भारतीय राजकारणी, लेखक, पत्रकार आणि स्वातंत्र्यसैनिक कमलापती त्रिपाठी यांचा जन्मदिन.
१९२३: किशन महाराज – संगीत नाटक अकादमी पुरस्कार तसचं पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय शास्त्रीय संगीताच्या बनारस घराण्यातील सुप्रसिद्ध तबला वादक पंडित. तबला सम्राट. बनारस घराण्याचे तबला वादक. वडिलांकडून त्यांनी आपले शिक्षण सुरु केले. (मृत्यू: ४ मे २००८)
१९२३: कृष्णराव तथा 'शाहीर' साबळे – संगीत नाटक अकादमी तसचं पद्मश्री पुरस्कार सन्मानित महाराष्ट्रीयन मराठी शाहीर. 'महाराष्ट्राची लोकधारा' या आपल्या कार्यकमातून लावणी, कोकेवाला (ग्रामीण भागात सारंगीसारखे वाद्य वाजवून देवादिकांची आख्याने गाणारा) या कार्यक्रमाला अफाट लोकप्रियता मिळाली होती (मृत्यू: २० मार्च २०१५)
१९२३: टाको बेल चे संस्थापक ग्लेन बेल यांचा जन्म. (मृत्यू: १६ जानेवारी २०१२)
१९२६: भारतीय बंगाली व हिंदी चित्रपट अभिनेते उत्तम कुमार यांचा जन्मदिन.
१९२७: अरुण कुमार चटर्जी तथा 'उत्तम कुमार' – बंगाली व हिन्दी चित्रपट अभिनेते (मृत्यू: २४ जुलै १९८०)
१९३१: श्याम फडके – नाटककार ('काका किशाचा', 'तीन चोक तेरा', 'राजा नावाचा गुलाम' फेम)
१९३८: नोबेल पारितोषिक विजेते जपानी रसायनशास्त्रज्ञ रायोजी नोयोरी यांचा जन्म.
१९४०: प्यारेलाल रामप्रसाद शर्मा – चित्रपटसृष्टीत चार दशके लोकप्रिय संगीत देणार्या 'लक्ष्मीकांत-प्यारेलाल' या जोडीतील संगीतकार
१९५६: भारतीय अभिनेते आणि दिग्दर्शक जिझु दासगुप्ता यांचा जन्म. (मृत्यू: २१ डिसेंबर २०१२)
१९५७: भारतीय योग गुरु व सद्गुरू नावाने प्रख्यात ईशा फाउंडेशनचे संस्थापकजग्गी वासुदेव यांचा जन्मदिन.
१९६५: अमेरिकन अभिनेता चार्ली शीन यांचा जन्म.
१९७१: भारतीय-अमेरिकन लेखक किरण देसाई यांचा जन्म.
१९७४: भारतीय क्रिकेटपटू राहुल संघवी यांचा जन्म.
१९९२: राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार व पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय कुस्तीपटू महिला साक्षी मलिक यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६५८: इंग्लंडचा राज्यकर्ता ऑलिव्हर क्रॉमवेल यांचे निधन.
१९४८: चेकोस्लोव्हेकियाचे दुसरे राष्ट्राध्यक्ष एडवर्ड बेनेस यांचे निधन.
१९५३: लक्ष्मण तथा 'खाप्रुमामा' पर्वतकर – तबला, घुमट व सारंगीवादक. गोव्यातील 'घुमट' हे तालवाद्य ते अत्यंत कौशल्याने वाजवत. (जन्म: ? ? १८८०)
१९५८: माधव केशव काटदरे – निसर्गकवी (जन्म: ३ डिसेंबर १८९२)
१९६७: अनंत हरी गद्रे तथा समतानंद – वार्ताहर, संपादक, थोर समाजसुधारक आणि नाटिका संप्रदायाचे प्रवर्तक, जाहिरातशास्त्रातील तज्ञ. 'मौज' आणि 'निर्भिड' ही साप्ताहिके त्यांनी सुरू केली. जातीयता निर्मूलनासाठी त्यांनी सहभोजनाचा (त्या काळातील धाडसी) उपक्रम चालवला. (जन्म: १६ आक्टोबर १८९०)
१९९१: अमेरिकन चित्रपट दिग्दर्शक फ्रॅंक काप्रा यांचे निधन.
२०००: पांडुरंग पुरुषोत्तम शिरोडकर – स्वातंत्र्यसैनिक, गोवा विधानसभेचे पहिले सभापती
२०१४: भारतीय राजकारणी ए. पी. वेंकटेश्वरन यांचे निधन. (जन्म: २ ऑगस्ट १९३०)

# शेतकऱ्यांच्या आत्महत्येची वाट बघू नका; दुष्काळ जाहीर करा -खा.कल्याण काळे

## पीक परिस्थिती आढावा बैठकीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधले

जालना। प्रतिनिधी

महसूल विभागातील खरीप पीक परिस्थिती गंभीर बनली असून, पावसाच्या दीर्घ खंडामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर आज नांदेड येथील नियोजन भवनात मा. कृषिमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या पीक परिस्थिती आढावा बैठकीस जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून सहभागी होत शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधले.जालना जिल्ह्याचे सरासरी वार्षिक पर्जन्यमान ६०३ मि.मी. असून चालू वर्षी आतापर्यंत सुमारे ४०५ मि.मी. पर्जन्यमान झाले आहे. जिल्ह्यात खरीप पिकांचे सर्वसाधारण क्षेत्र ६.१९ लाख हेक्टर असताना चालू वर्षी खरीप क्षेत्र ५.८६ लाख हेक्टर आहे. दुसरीकडे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ६३६.९९ मि.मी. असून चालू वर्षी सुमारे ४२२ मि.मी. पर्जन्यमान झाले आहे. या जिल्ह्यात सरासरी खरीप क्षेत्र ६.८४ लाख हेक्टर असून चालू वर्षी खरीप क्षेत्र ६.३७ लाख हेक्टर आहे.जालना जिल्हा प्रशासनाच्या प्राथमिक अहवालानुसार यंदाच्या खरीप हंगामात पर्जन्यमानातील अनिश्चितता तसेच पावसाच्या खंडाचा पिकांच्या परिस्थितीवर परिणाम झाला आहे. १४ सप्टेंबरअखेर जूनपासून झालेला पाऊस या कालावधीतील सरासरीच्या ८१% इतका झाला असून सप्टेंबर महिन्यातील पर्जन्यमान सरासरीच्या केवळ ३३.१% इतके नोंदविण्यात आले आहे.

या परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पात्र भागात तातडीने दुष्काळ जाहीर करून दुष्काळी उपाययोजना लागू कराव्यात, अशी ठाम मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी बैठकीत केली.केवळ पर्जन्यमानाची सरासरी पाहून परिस्थितीचे मूल्यमापन न करता पावसातील खंड, पिकांची सद्यस्थिती, जमिनीतील ओलावा आणि प्रत्यक्ष उत्पादनातील संभाव्य घट यांचा एकत्रित विचार करून निर्णय घेण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.पावसाअभावी खरीप पिकांसोबतच पशुधनासाठी चारा व पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ज्या भागात चारा व पाण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, त्या ठिकाणी तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी डॉ. काळे यांनी केली.मराठवाड्यातील पावसाच्या तुटीमुळे खरीप पिकांची स्थिती



चिंताजनक असल्याचे अलीकडील अहवालांमध्ये नमूद करण्यात आले असून काही भागांत पाणी व चारा उपलब्धतेचा प्रश्नही गंभीर होत असल्याचे वृत्त आहे.

पीक हातातून गेल्यानंतर शेतकऱ्यांसमोर कर्जफेडीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांनी पेरणी, बियाणे, खते, औषधे व मशागतीसाठी केलेला खर्चही वसूल होण्याची शक्यता कमी झाली आहे.त्यामुळे चालू वर्षी शेतकऱ्यांनी घेतलेले पीक कर्ज माफ करावे, अशी स्पष्ट मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली.तसेच, यापूर्वीच्या कर्जमाफीच्या प्रक्रियेत विविध कारणांमुळे कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांनाही यावेळी कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. पीकविमा योजनेत शेतकऱ्यांना नुकसान नोंदणी व विमा दावा दाखल करताना येणाऱ्या अडचणींचा विचार करून पीकविम्यासाठी पूर्वीची सुलभ पोर्टल प्रणाली पुन्हा सुरू करावी, अशी मागणी डॉ. काळे यांनी केली.तसेच पीकविमा नुकसानभरपाई निश्चित करताना केवळ वर अवलंबून राहू नये, असे त्यांनी स्पष्ट केले.पावसातील खंड, महसूल मंडळनिहाय पिकांची प्रत्यक्ष स्थिती, शेतातील पीक नुकसान, जमिनीतील ओलावा आणि उत्पादनातील घट या सर्व बाबींचा एकत्रित विचार करून नुकसान निश्चित करावे. प्रत्यक्ष शेतकऱ्याचे नुकसान लक्षात न घेता केवळ कागदोपत्री किंवा मर्यादित पीक कापणी प्रयोगांच्या आधारे विमा नुकसानभरपाई निश्चित करणे अन्यायकारक ठरू शकते, असेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ३० महसूल मंडळांत २१ दिवसांपेक्षा अधिक पावसाचा खंड नोंदविल्याचे अलीकडील वृत्त आहे.पावसाची कमतरता कायम राहिल्यास ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, तसेच संभाव्य टंचाईग्रस्त गावांमध्ये तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे, अशी मागणी खासदार डॉ. काळे यांनी केली.जालना जिल्ह्यात पावसाच्या खंडामुळे जलसाठे व विहिरींच्या पाणीपातळीवर परिणाम होत असून टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची गरज वाढल्याचे अलीकडील वृत्त आहे. पीक नुकसानामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम झाला असून ग्रामीण भागातील शेतमजुरांसमोरही रोजगाराचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत तातडीने मोठ्या प्रमाणावर कामे सुरू करून शेतकरी व शेतमजुरांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी डॉ. काळे यांनी केली.बैठका, पंचनामे आणि अहवाल यापुरते हे संकट मर्यादित ठेवता कामा नये. शेतकऱ्याच्या हातात प्रत्यक्ष मदत पोहोचणे महत्त्वाचे आहे. त्याचे पीक गेले, उत्पादन गेले आणि उत्पन्नाचा स्रोत गेला आहे. अशा परिस्थितीत त्याला पुन्हा कर्जाच्या ओझ्याखाली ढकलण्याऐवजी शासनाने त्याच्या पाठीशी ठोसपणे उभे राहण्याची आवश्यकता आहे, अशी भूमिका खासदार डॉ. कल्याण काळे यांनी बैठकीत मांडली.तसेच महसूल व कृषी विभागाने महसूल मंडळनिहाय प्रत्यक्ष पीक पाहणी करून वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत, पीकविमा कंपन्यांना तातडीने आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासकीय मदत व पीकविम्याचा लाभ वेळेत मिळेल, यासाठी कालबद्ध कार्यवाही करावी, अशी मागणीही त्यांनी केली. दुष्काळ जाहीर करणे, चारा छावण्या सुरू करणे, पीक कर्जमाफी, यापूर्वी वंचित राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ, पीकविम्यासाठी पूर्वीची पोर्टल प्रणाली सुरू करणे, ऊींर्ीींळपस पुरते नुकसान मूल्यांकन मर्यादित न ठेवणे, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करणे आणि रोजगार हमीची कामे तातडीने सुरू करणे, या मागण्यांवर शासनाने सकारात्मक व तातडीने निर्णय घ्यावा, अशी ठाम भूमिका खासदार डॉ. कल्याण काळे यांनी बैठकीत मांडली.

# बंद होण्याच्या उंबरठ्यावर असलेली येळी शाळा आता पुन्हा बोलू लागली



पाथर्डी । प्रतिनिधी

तालुक्यातील येळी येथील झेडपी शाळा बंद होण्याच्या उंबरठ्यावर होती परंतु आता ती पुन्हा बोलू लागली असून ही शाळा फिनिक्स भरारी घेत आहे या शाळेचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे ६ विद्यार्थी पटसंख्या वरून या शाळेची सध्या ३० पटसंख्या झाली आहे यामध्ये शिक्षकांची धडपड व ग्रामस्थांची साथ यामुळे झेडपी शाळेचा प्रेरणादायी कायापालट झाला आहे लोकसहभाग गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास हे गुणवैशिष्ट्य असलेली ही शाळा ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण क्षेत्रात घेतलेल्या आपल्या गरुड झेपेमुळे कौतुकाचा विषय ठरत आहे या शाळेतील सर्व विद्यार्थी वाचन लेखन गणिती क्रिया करतात यावर्षी इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल देखील चांगल्या टक्केवारी मध्ये लागला आहे शाळेमध्ये शंभर टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती असते विद्यार्थ्यांना त्यांच्या वैयक्तिक क्षमतेनुसार शिक्षक मार्गदर्शन करतात वक्तृत्व कला हस्ताक्षर चित्रकला क्रीडा पर्यावरण वैज्ञानिक दृष्टिकोन इंग्रजी संवाद कौशल्य व स्वच्छतेचे धडे यावरती विशेष भर दिला जातो यामुळे पालकांचा व ग्रामस्थांचा विश्वास वाढलेला आहे असे यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विकास गर्जे यांनी सांगितले शाळेमध्ये पाण्याचा प्रश्न असताना देखील शाळेमध्ये वृक्षारोपण करण्यात आले आहे.

शाळेचे शिक्षक मच्छिंद्र बडे सुरेखा कल्याण कराड यांची येळी शाळेत बदली झाल्याने बंद होण्याच्या उंबरठ्यावर असलेली येळी झेडपीची शाळा आता पुन्हा बोलू लागली असे उपसरपंच आबासाहेब जायभाये व शिवदास गर्जे यांनी सांगितले.

# पाथर्डीत अवैध वाळू वाहतुकीवर एलसीबीचा दणका

## जेसीबी,डंपरसह ४०.४० लाखांचा मुद्देमाल जप्त!

पाथर्डी । प्रतिनिधी

वाळू वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने एलसीबी पाथर्डी तालुक्यातील बोरुडे मळा येथे मोठी कारवाई केली आहे या कारवाईत जेसीबी टाटा डंपर आणि वाळूसह तब्बल ४० लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे या प्रकरणी एका तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून वाहनमालक असल्याचे पोलिसांनी सांगितलेला व्यक्ती फरार असल्याची माहिती आहे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार उमेश विष्णू कचरे (वय २२ रा.पाडळी ता.पाथर्डी) याला ताब्यात घेण्यात आले आहे .

बोरुडे मळा परिसरात अवैधरीत्या वाळू वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या च्या पथकाने ही कारवाई केली यामध्ये जेसीबी आणि डंपरसह लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून कारवाईदरम्यान पोलिसांनी एक जेसीबी टाटा डंपर आणि वाळू असा मुद्देमाल ताब्यात घेतला चौकशीदरम्यान संबंधित वाळू वाहतुकीसाठी आवश्यक परवाना नसल्याचे पोलिसांच्या माहितीत नमूद करण्यात आले याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गु.र.नं. ११५१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२)३(५) तसेच पर्यावरण कायदा कलम ३(१५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने ही कारवाई केली पाथर्डी तालुक्यात अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीविरोधात झालेल्या या कारवाईमुळे वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे आगामी काळात अशा प्रकारच्या कारवाया आणखी तीव्र होणार का याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# मंदिराच्या ६ पितळी घंटा परत आणून द्या

## संतप्त भाविकांचे पोलिसांना निवेदन



अंबड। प्रतिनिधी

अंबड शहरातील प्राचीन व जागृत स्वयंभू महादेव मंदिरातून ६ पितळी घंटा चोरीला गेल्याची धक्कादायक घटना सात दिवसापूर्वी मध्यरात्री घडली. अध्यापर्यंत पोलिसांनी तपास केला नाही. या घटनेमुळे भाविकांच्या धार्मिक भावना दुखावल्या असून परिसरात चिंता व्यक्त केली जात आहे. या चोरीप्रकरणी तात्काळ तपास करून चोरट्यांचा शोध घ्यावा आणि चोरीस गेलेल्या ६ घंटा परत आणाव्यात, अशी मागणी संतप्त भाविकांनी केली आहे.

यासंदर्भात सकल हिंदू समाज आणि स्वयंभू महादेव भक्त परिवाराच्या वतीने अंबड ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष घोडके यांना निवेदन देण्यात आले. स्वयंभू महादेव मंदिर हे अंबड शहरातील श्रद्धा, संस्कृती आणि धार्मिक परंपरेचे महत्त्वाचे केंद्र असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावर एकनाथ साखरे, बाबू लांडे, दीपक लोहकरे, अमोल आढावे, महादेव भागवत, श्याम पिराणे, अंकुश गाडेकर, महेश राऊत, राहुल विसपुते, राजू मंडलिक, हरेश दुले, विकास राऊत, सतीश भागवत, भीमा धायाळ, ज्ञानेश्वर भागवत, सुरेश छडीदार, प्रशांत जाधव, शंकर भागवत यांच्यासह स्वयंभू महादेव भक्त परिवारातील अनेक भाविकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# दहीपुरी शाळेची विविध खेळाच्या स्पर्धेमध्ये जिल्हास्तरावर निवड

**अंबड। प्रतिनिधी**

**क्रीडा युवक सेवा संचालनालय व तालुका क्रीडा अधिकारी अंबड यांच्या संयुक्त विद्यमाने मत्स्योदरी महाविद्यालय अंबड या ठिकाणी झालेल्या तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धेमध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर दहीपुरी शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेमध्ये विजय संपादन करून जिल्हा स्तरावर प्रवेश केला आहे.**

त्यामध्ये कॅरमशुभम पवार सरोज निर्मळ आयेशा शेख सायली निर्मळ त्रिवेणी तोगे शेख तालेब तसेच बुद्धिबळ स्पर्धेमध्ये मंगेश नंदलाल मेघा नंदलाल वादे करण सोमनाथ अशा विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये विजय संपादन केलेला आहे व जिल्हा स्तरावर मजल मारलेली आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष चंद्रमणी खरात सचिव अमोल खरात, सरपंच संतोष सपकाळ, माजी पोलीस पाटील गौतमराव लिहिणार, पोलीस पाटील सोनाजी टापरे, संस्था सदस्य उत्तमराव येडे,सिद्धार्थ खरात,मुख्याध्यापक दिनेश ठाकूर,शिक्षक वृंद सर्वश्री प्रेमदास राठोड, हकीम पटेल, परमेश्वर उगले, सचिन अंबडकर, बाळासाहेब ढेंबरे, अजित खरात, श्रीमती प्रतिज्ञा पनाड, किशोर शिंगणे, व यावेळी पालक वर्ग, गावकरी होते.

# पाथर्डी पोलीस ठाण्यातील एजंट विनोद लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या जाळ्यात !

## पाच लाख रुपये लाचेची मागणी,तडजोडीअंती अडीच लाख रुपये घेताना रंगेहात पकडले!

पाथर्डी । प्रतिनिधी

आरोपी लोकसेवक विनोद शिवाजी मासाळकर वय ३७ वर्ष नोकरी पोलीस अंमलदार ब.नं.२४६७ यातील मुळ तक्रारदार यांच्या हॉटेलवर काम करणारा नोकर मोटार सायकलवर पाथर्डी गावातुन जात असतांना त्याचे एका अनोळखी ट्रक चालकासोबत गाडीला कट मारला या कारणावरून भांडण होवुन त्यांची आपआपसात मारामारी झाली होती लोकसेवक यांनी तक्रारदार यास तुमच्या हॉटेलवर काम करणाऱ्या नोकरावर हापमर्डर व रॉबरी चा गुन्हा दाखल करतो असे सांगीतले होते त्यानंतर तक्रारदार हे लोकसेवक पो.अं/ विनोद मासाळकर यांना पाथर्डी पोलीस ठाणेस जावुन भेटले तेव्हा लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे नोकरावर हापमर्डर व रॉबरी चा गुन्हा दाखल न करता वरिष्ठांना सांगुन सौम्य स्वरूपाचा मारामारीचा गुन्हा दाखल करतो व त्यांना लवकरात लवकर जामीन मंजुर करून तपासात मदत करतो असे प्रलोभन दाखवून ५,००,०००/-रूपये ची मागणी केली होती तक्रारदार यांना लोकसेवक विनोद मासाळकर यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांचेकडे दि.१८/०९/२०२६ रोजी तक्रार दिली होती यावरून लाच पडताळणी सदर तक्रारीवरुन दि.१९/०९/२०२६ रोजी पडताळणी केली असता आरोपी विनोद मासाळकर याने तक्रारदार यांच्याकडे ५,००,०००/- रुपये मागणी करून पंचासमक्ष तडजोडअंती २,१५,००००/- रुपये लाचेची मागणी करून स्वीकारण्याचे मान्य करून दि.१९/०९/२०२६ रोजी लाचेचा सापळा आजमावणी केली असता आलोसे यांनी मागणी केलेली लाचेच्या रकमेपैकी १,००,०००/- रुपये तक्रारदाराकडे उपलब्ध पंच साक्षीदार यांचेसमक्ष स्वीकारले यावरून लोकसेवक आरोपी विनोद शिवाजी मासाळकर याविरुद्ध गुन्हा रजि.नं.कलम पो.स्टे.पाथर्डी २०२६ येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे आरोपी विनोद मासाळकर यास ताब्यात घेण्यात आले असून अटक करण्याची तजवीज ठेवली आहे.

आरोपी लोकसेवक विनोद मासाळकर यांचे अंगझडतीत विवो कंपनीचा मॉडेल नंबर वी ५० मोबाईल मिळून आलेला आहे तसेच आरोपी अंगझडतीत १५,१३०/- रुपये एटीएम कार्ड मिळून आले आहे आरोपीची घरझडती घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे सदरील कारवाईमध्ये सापळा अधिकारी संतोष पैलकर पोलीस उपअधीक्षक ला.प्र.वि.नाशिक यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली असून सदरील कारवाई पथकामध्ये दिनेश खैरनार अविनाश पवार योगेश शिंदे उपस्थित होते लोकसेवक आरोपी विनोद शिवाजी मासाळकर याच्या तपास अधिकारी सविता तांबे असून मार्गदर्शक भारत तांगडे पोलीस अधीक्षक प्रदीप मैराळे अपर पोलीस अधीक्षक कविता फडतरे अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक परिक्षेत्र नाशिक हे आहेत.

### कलेक्शन किंग आणि सेटलमेंट किंग म्हणून वावरत होता एजंट विनोद?

पाथर्डी पोलीस ठाण्यात गेल्या सात ते आठ वर्षांपासून शासनाच्या महाराष्ट्र पोलीस सेवा बदली अधिनियम १९५१ कलम २२ (२) अनुसार नियम पायदळी तुडवून आरोपी विनोद मासाळकर हे पाथर्डी पोलीस ठाण्यात ठाण मांडून बसले होते पाथर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व कुख्यात गुंड अवैध धंदे करणारे गुंड वाळूमाफिया दारू माफिया जुगार मटका बिंगो यांच्याबरोबर आर्थिक सेटलमेंट करणारे व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मर्जीतील कलेक्शन व सेटलमेंट किंग म्हणून एजंट विनोद याची खास ओळख होती खोटे गुन्हे दाखल करणे व विशिष्ट एजंट लोकांना हाताशी धरून लाखो रुपयांची आर्थिक तडजोड करणारा पोलीस कर्मचारी म्हणून एजंट विनोदची पाथर्डी पोलीस ठाण्यात विशेष ओळख होती.

# चौऱ्याऐंशी कोटींची पाणी योजना रखडली!

## पाटोद्यात पाण्यासाठी हाहाकार; डेडलाईन संपून दोन वर्षे उलटली, तरी काम अधुरेच!

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन नागरिकांची पाण्याची गरज भागवण्यासाठी शासनाने लांजेश्वर प्रकल्पातून समांतर जलवाहिनी योजनेला मंजुरी दिली. नगरपंचायतीने संबंधित कंत्राटदाराला हे काम १८ महिन्यांत पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. मात्र, निर्धारित मुदत संपून तब्बल दोन वर्षे उलटूनही योजनेचे काम पूर्ण झालेले नसल्याने शहरातील पाणीप्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. पाटोदा शहर तसेच नगरपंचायत हद्दीतील वाड्या-वस्त्यांना मिळून दररोज सुमारे ३.२ एमएलडी पाण्याची गरज आहे. मात्र, योग्य नियोजनाअभावी शहरातील काही भागात तब्बल ९ दिवसांनी, तर काही प्रभागांमध्ये १५ दिवसांनंतर पाणीपुरवठा होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शहरातील ३० पेक्षा अधिक वसाहतींमध्ये नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.

हा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी राज्य सरकारने ८४ कोटी रुपयांची नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर केली असून, या योजनेचे काम 'संतोष इन्फ्रा' कंपनीला देण्यात आले आहे. मात्र, शहरातील सात ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या पाण्याच्या टाक्या तसेच पाइपलाइनचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने योजनेच्या पूर्णत्वाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पाइपलाइन टाकण्यासाठी शहरातील अनेक रस्ते उखडण्यात आले आहेत. कामानंतर रस्त्यांची योग्य



डागडुजी न झाल्याने अनेक ठिकाणी चिखल आणि पाणी साचत आहे. त्यामुळे नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, काही वयोवृद्ध नागरिक घसरून जखमी झाल्याची माहिती आहे.

कामाच्या संथ आणि विस्कळीत पद्धतीमुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढली असून, संबंधित कंत्राटदाराच्या कामकाजावर प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

यंदा महासांगवी तलावात शून्य टक्के पाणीसाठा असल्याने पाटोदा शहराचा पाणीप्रश्न अधिक गंभीर झाला आहे. सध्या तालुक्यातील उकडा येथील तलावातून १८ टँकरच्या प्रत्येकी दोन फेऱ्या, अशा तब्बल ३६ फेऱ्यांद्वारे शहराला पाणीपुरवठा केला जात आहे.

एकीकडे नागरिकांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत असताना दुसरीकडे कोट्यवधी रुपयांची कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना रखडल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. संबंधित कंत्राटदाराने निर्धारित वेळेत काम पूर्ण केले असते तर टँकरवर होणारा लाखो रुपयांचा खर्च टाळता आला असता, अशी नागरिकांची भावना आहे. नगरपंचायतीकडून संबंधित कंत्राटदाराला नोटीस बजावण्यात आल्याचे सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्ष कामाच्या गतीमध्ये अपेक्षित सुधारणा झालेली दिसत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यामुळे कंत्राटदाराच्या कामाला नेमका कोणाचा वरदहस्त आहे? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पाणीपुरवठा योजनेचे काम तातडीने पूर्ण करून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, तसेच उखडलेले रस्ते तातडीने पूर्ववत करावेत, अशी जोरदार मागणी पाटोदा शहरातील नागरिकांकडून होत आहे.

# इतिहासाचा साक्षीदार माजलगावचा ऐतिहासिक झेंडा चौक!

माजलगाव । प्रतिनिधी

स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात माजलगावच्या ऐतिहासिक झेंडा चौकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. १९४७ च्या काळात देश स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना हैदराबाद संस्थानातील जनतेचा स्वातंत्र्यासाठीचा संघर्ष सुरू होता. तिरंग्याच्या सन्मानासाठी झालेल्या झेंडा सत्याग्रहाने या संघर्षाला नवी दिशा दिली.

माजलगावचा ऐतिहासिक झेंडा चौक आजही त्या संघर्षाच्या आणि क्रांतिकारकांच्या त्यागाच्या आठवणी जिवंत ठेवतो. स्वातंत्र्यासाठी लढलेल्या वीरांच्या शौर्याला आणि बलिदानाला अभिवादन करण्यासाठी या ऐतिहासिक स्थळाला विशेष



**क्रांतिकारकांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आज तिरंगा रॅली**

महत्त्व प्राप्त झाले आहे.

या क्रांतिकारकांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आज सोमवार दी २१ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता झेंडा चौक,माजलगाव येथून भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.रॅलीमध्ये नागरिकांनी, युवकांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी तसेच देशप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. इतिहास जपूया क्रांतिकारकांना अभिवादन करूया तिरंग्याचा सन्मान राखूया! ऐतिहासिक वारशाची जपणूक आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या तिरंगा रॅलीत नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# संशयित तांदूळ प्रकरण ट्रक चालक मालकाची चौकशीला टाळाटाळ

## नेकनूर पोलीसही हतबल आता खाक्या दाखवण्याची गरज

बीड । प्रतिनिधी

शुक्रवारी रात्री मांजरसुंबा ते लिंबागणेश रोडवर संशयित तांदळाने भरलेला ट्रक पलटी झाल्यानंतर पोलिसांनी तांदळासह ट्रक ताब्यात घेतला.

प्रामुख्याने यातील तांदूळ रेषणचा आहे की अंगणवाडीतील सकस आहार या संदर्भातील चौकशी अद्यापही गुलदस्त्यात असून नेकनूर पोलिसांनी सदर ट्रक चालक आणि मालकाला चौकशीसाठी बोलावले मात्र त्यांनी पोलिसांच्या आदेशाला



तांदळासह ट्रक पोलीस ठाण्यात

सदर तांदूळ रेशनचा की अंगणवाडीचा? चौकशी सुरू

बीड । प्रतिनिधी

पाटोद्याकडून मांजरसुंबा मार्गे १२ टायर ट्रक अचानक मांजरसुंबा नजीक पलटी झाला या ट्रकमध्ये तांदूळ दिसून आल्याने नागरिकांनी हा रेशनचा तांदूळ असावा आणि काळ्या बाजारात विक्रीसाठी जात असल्याचा संशय आल्याने त्यांनी पोलिसांना याची माहिती दिली. रात्री उशिरा पोलिसांनी तांदळासह ट्रक ताब्यात घेत पोलीस ठाण्यामध्ये लावला. विशेषतः तांदूळ स्वस्त धान्य दुकानावरील आहे की अंगणवाडीतील सकस आहार? याबाबत चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

शुक्रवारी रात्री अकरा वाजण्याच्या दरम्यान पाटोद्याकडून मांजरसुंबाच्या दिशेने निघालेला १२ टायर ट्रक क्रमांक .०९/६८ ५५ च्या चालकाच्या निष्काळजीपणामुळे वळणावर हा १२ टायर ट्रक पलटी झाला. ट्रक पलटी झाल्याने बाजूलाच असलेल्या खंडाळा व जाधव वस्ती येथील नागरिक जमा झाले.कोणाला काही दुखापत झाली असेल तर पाहत असताना सदर ट्रकमध्ये तांदळाच्या गोण्या आढळून आल्या. ट्रक अपघातग्रस्त झाल्याने हा तांदूळ इतरत्रही पडला होता. त्यामुळे हा तांदूळ स्वस्त धान्य दुकानावरील असावा म्हणून काही नागरिकांनी नेकनूर पोलिसांना याची माहिती दिली. या घटनेनंतर काही वेळानेच दोन अनोळखी वाहने आली. त्यांनी चालकांना गाडीत बसवून पोलीस ठाण्याकडे नेले. त्यानंतर रात्री दोनच्या सुमारास पुन्हा दुसरी एक ट्रक आली.. त्यामध्ये हा तांदूळ हलवण्यात आला होता. अशी माहिती देण्यात आली.मात्र उशिरा नेकनूर पोलिसांशी संपर्क साधला असता अपघात ग्रस्त ट्रकसह यामध्ये असलेला तांदूळ पोलीस ठाण्यामध्ये ठेवण्यात आल्याचे सांगण्यात आले. प्रामुख्याने या संदर्भात तेथील ठाणे प्रमुख मंगेश साळवे यांच्याशी संपर्क केला असता ते म्हणाले की तांदळासह ट्रक नेकनूर पोलीस ठाण्यामध्ये असून त्यातील तांदूळ रेषणचा आहे की अंगणवाडीचा सकस आहार? या संदर्भात चौकशी सुरू आहे.

जामखेड-आष्टी कनेक्शन

स्वस्त धान्याचा काळाबाजार यापूर्वी मोठ्या प्रमाणात होत होता. मात्र आता ऑनलाईन प्रक्रिया सुरू झाल्याने याला काहीसा ब्रेक लागला आहे. परंतु तरीही त्यावर पर्याय काढला जात असून तांदळाचा जो ट्रक पलटी झाला. त्या संदर्भात चालक फोनवर बोलताना आष्टी, पाटोदा, जामखेड येथे संपर्क करत असल्याचे प्रत्यक्ष दर्शीनी सांगितले.

गांभीर्याने घेतले नाही. त्यामुळे ही चौकशी अद्यापही लटकलेलीच आहे. तेव्हा आता पोलिसांनी खाक्या दाखविण्याची गरज असल्याचे दिसून येते.

शुक्रवारी रात्री लिंबागणेश ते मांजरसुंबा या मार्गावरील खंडाळा पाठीजवळ १२ टायर ट्रक क्रमांक चक०९/ उत ६८५५ हा पलटी झाला होता. पलटी झाल्यानंतर या ट्रक मध्ये तांदळाच्या गोण्या आढळून आल्या हा तांदूळ रेशनचा किंवा अंगणवाडी मधील सकस आहाराचा असावा की हैदराबाद कडे काळ्या बाजारात विक्रीसाठी जात असावा असा संशय आल्याने येथील काही नागरिकांनी पोलिसांना कल्पना दिली. पोलिसांनी पलटी झालेला ट्रक व्यवस्थित करून ट्रकसह मुद्देमाल नेकनूर पोलीस ठाण्यामध्ये जमा केला. प्रामुख्याने यामधील तांदूळ हा शासकीय वितरण व्यवस्थेमधील आहे की काय? याची चौकशी पोलिसांनी सुरू केली.

◀◀ पान ३ वर

# व्यापारी गणेश मंडळाच्या रक्तदान शिबिरात २६ रक्तदात्यांचे रक्तदान

दिंद्रुड । प्रतिनिधी

येथील व्यापारी गणेश मंडळाच्या वतीने काल रविवारी (दि.२०) सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २६ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक जबाबदारी जपली. येथील समस्त व्यापारी बांधव मिळून गणेश मंडळाची तब्बल मागच्या २६ वर्षांपासून स्थापना करुन आनंदोत्सव साजरा करतात.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन व श्रींची आरती चंद्रभागा समूहाचे अध्यक्ष अतुल ठोंबरे व पत्रकार नागेश वकरे यांच्या हस्ते करण्यात आली. रविवारी सकाळी दहा ते दुपारी चार वाजेपर्यंत चाललेल्या शिबिरात रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांना मंडळाच्या वतीने नाष्टा व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच व्यापारी गणेश मंडळाने यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले आहे. त्यामध्ये नुकत्याच झालेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरात १५० नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर गरजेनुसार नागरिकांना गोळ्या, औषधे व सलाईन मोफत उपलब्ध करून देण्यात आले होते.गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक बांधिलकी जपणारा उत्सव ठरावा. या उद्देशाने व्यापारी गणेश मंडळाच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. रक्तदान शिबिर व आरोग्य तपासणी शिबिराला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.



# लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना यंदाच्या गळीत हंगामात २९७०/प्रती टन भाव देणार

माजलगाव । प्रतिनिधी

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५-२६ या वर्षातील ३७ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा दि २० सप्टेंबर रविवार रोजी संपन्न झाली. परिसरातील शेतकरी बांधवांनी कारखान्यावर दाखविलेल्या विश्वासामुळे आजतागायत कारखान्याने सातत्याने गळीत हंगाम पूर्ण केले, याचा निश्चितच आनंद असल्याचे प्रतिपादन

**अधिकचा भाव देऊन शेतकऱ्यांचा सन्मान करण्याचा निर्धार -आ.प्रकाश सोळंके**





आ.प्रकाश सोळंके यांनी केले.तसेच यंदाच्या गळीत हंगामासाठी कारखाना प्रतिटन २९७०/ भाव जाहीर करण्यात आला

यावर्षी दुष्काळी परिस्थिती आणि पावसाचा अभाव यामुळे उसाच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असून, हेक्टरी २० ते ३० टनांपर्यंत उत्पादनात घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे यंदाच्या हंगामात कारखाना ◀◀ पान ३ वर

# काकूंच्या आशीर्वादानेच शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडवण्याचे कार्य सुरू -डॉ योगेश क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, आधुनिक ज्ञान, नवनवीन तंत्रशिक्षण आणि रोजगाराभिमुख शिक्षण देऊन त्यांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. लोकनेत्या स्व. केशरकाकू क्षीरसागर यांनी लावलेले हे शैक्षणिक रोपटे आज वटवृक्ष झाले असून, शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडविण्याचा हा प्रवास यापुढेही अधिक व्यापक आणि गुणवत्तापूर्ण केला जाईल, असे प्रतिपादन नवगण शिक्षण संस्था व विनायक युवक कल्याण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

येथील सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात रविवारी (दि.२०) नवगण व



विनायक शिक्षण संस्था शिक्षक-कर्मचारी पतसंस्थेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा पार पडला. याप्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते.


पुढे बोलताना ते म्हणाले, जिल्ह्यात शिक्षणाच्या पुरेशा सुविधा नसताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी, या दूरदृष्टीने स्व. केशरकाकूंनी संस्थेची स्थापना केली. दुर्गम खेड्यापाड्यांत शाळा सुरू करून समाजसेवेचे व्रत घेतले. आज दोन्ही संस्थांच्या माध्यमातून दरवर्षी सुमारे २५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ग्रामीण भागातील शाळांना पक्क्या इमारती, खेळाचे मैदान, दळणवळण अशा सर्व अद्ययावत भौतिक सुविधा पुरविल्या जात आहेत. काळाच्या ओघात होणाऱ्या बदलांनुसार नवीन तंत्रशिक्षण व रोजगार देणारे नवनवीन विषय महाविद्यालयात आणले जात आहेत. शिक्षणासोबतच वृक्षारोपण करून पर्यावरणपूरक उपक्रमही राबवले जात आहेत. तसेच पतसंस्थेच्या कामकाजात आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि सभासदांचा विश्वास कायम राखण्यावरही त्यांनी यावेळी भर दिला. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र ◀◀ पान ३ वर

### शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर

# अध्यक्षपदी जगदीश गोरे,उपाध्यक्ष अजय राऊत,राहुल काळे तर सचिवपदी दादा अंबुरे

वडवणी । प्रतिनिधी

शिवरत्न जिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त वडवणी येथे विविध उपक्रम व भव्य जयंती उत्सवाचे आयोजन करण्याच्या पार्श्वभूमीवर शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सव समिती ता. वडवणी सन २०२६ ची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. समितीच्या अध्यक्षपदी जगदीश बंकटराव गोरे यांची निवड करण्यात आली असून कार्याध्यक्षपदी संतोष वसंत बहिरे यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.



समितीच्या उपाध्यक्षपदी अजय वैजनाथ राऊत व राहुल अशोक काळे, सचिवपदी दादा सुरेश आंबुरे, सहसचिवपदी गोविंद अंकुश झेंडे, खजिनदारपदी कृष्णा तुकाराम काळे, तर सहखजिनदारपदी संतोष सर्जेराव काळे यांची निवड करण्यात आली आहे. प्रसिद्धीप्रमुख म्हणून अतुल रामभाऊ राऊत, संघटक म्हणून विश्वास राऊत, तर सहसंघटकपदी हनुमंत शेषराव आंबुरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# शिक्षकांच्या मागण्यांपदरात पाडून घेण्यासाठी सरकारच्या दारात निर्धार

## शिक्षक समन्वय संघाचा २१ सप्टेंबर २६ पासून आंदोलनाचा इशारा

वडवणी । प्रतिनिधी

राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्गतुकड्यांतील सुमारे ६५ हजार विना तथा अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना शासन निर्णय १५ नोव्हेंबर २०११ व ०४ जून २०१४ मधील वेतन अनुदान वितरणाचे सूत्र लागू करत या शाळांना विनाअट नैसर्गिक तत्वानुसार प्रतिवर्षी टप्पा वाढ लागू करणे,शासनाच्या चुकीमुळे १२,१५ व २४ फेब्रुवारी २०१९ च्या शासननिर्णयान्वये शासन स्तरावर त्रुटी पात्र ठरलेल्या शाळांना निधीसह समान टप्पावाढ लागू करणे, यासह इतर मागण्यांसाठी शिक्षक समन्वय संघाच्यावतीने मुंबईतील आझाद मैदानावर २१ सप्टेंबर २०२६ पासून निर्धार बेमुदत आंदोलन पुकारण्यात आले आहे.

राज्यातील 'कायम' शब्द काढलेल्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्गतुकड्यांवर सुमारे ६५ हजार शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी पंधरा ते वीस वर्षांपासून काही विनावेतन तर काही तुटपुंज्या वेतनावर काम करत आहेत. महाराष्ट्राच्या महान शैक्षणिक परंपरेचा हा अपमान आहे. शिक्षक दिनी शिक्षकांना देशाचे शिल्पकार, आधारस्तंभ म्हणायचे आणि त्यांच्या सेवेला वीस-वीस वर्षे झाली तरी निव्वळ वेतन राबवून घ्यायचे. एवढ्या प्रचंड कालावधीत विनावेतन आणि तुटपुंज्या वेतनावर काम करत असताना हे शिक्षक आपला उदरनिर्वाह कसा करत असतील याची जराही संवेदना राज्यकर्त्यांना नाही.

या वेदना शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी शिक्षक समन्वय संघाच्यावतीने येत्या २१ सप्टेंबर २०२६ पासून शासनाच्या दारी बेमुदत निर्धार धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

समन्वय संघाच्या वतीने शासनास दिलेल्या निवेदनात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्गतुकड्यांना मूल्यांकन वेळी ठरवलेल्या वेतन अनुदान वितरणाच्या नैसर्गिक तत्वानुसार प्रतिवर्षी टप्पावाढ अर्थात १५ नोव्हेंबर २०११ ◀◀ पान ३ वर

### अंशतः अनुदानित शाळांबाबत मागणी

अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्गतुकड्यांतील शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी यांना १५ नोव्हेंबर २०११ व ०४ जून २०१४ च्या शासन निर्णयामधील वेतन अनुदान वितरणाचे सूत्र लागू करत नैसर्गिक तत्वानुसार प्रतिवर्षी टप्पावाढ लागू करणे यासह इतर मागण्यासाठी हुंकार आंदोलन पुकारण्यात आले असून मागणी पूर्ण करून शासन निर्णय (कागद) शिक्षकांच्या हातात घेतल्याशिवाय उठायचे नाही असा ठाम निर्धार यावेळी शिक्षकांनी केलेला आहे.



- के. पी. पाटील, (समन्वयक, शिक्षक समन्वय संघ, आझाद मैदान, मुंबई)

### आश्वासन दिले तर त्याची पुर्तता करून घेणारच हाच ठाम निर्धार

राज्यशासनाच्या मान्यतेने सुरू असलेल्या अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी गेल्या पंधरा वर्षांपासून वेतनापासून वंचित आहेत.शासनाने आझाद मैदानावर १० जुलै रोजी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करून घेण्यासाठीचा यावेळी शिक्षकांनी ठाम निर्धार केलेला आहे.



- श्री.दीपक कुलकर्णी, (समन्वयक, शिक्षक समन्वय संघ, महाराष्ट्र राज्य)

### शासनाच्या वतीने घोषणा करण्याची मागणी

शासनाच्या वतीने अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षकांच्या मागण्यांबाबत बैठकीची घोषणा करून एक महिना उलटला असून अद्यापही या मागण्यांचा शासननिर्णय निर्गमित करण्यात आलेला नाही. सरकारने या शिक्षक समन्वय संघाच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून तात्काळ शासननिर्णय निर्गमित करून शिक्षकांना न्याय द्यावा.



- प्रा. राहुल कांबळे, (समन्वयक, शिक्षक समन्वय संघ, महाराष्ट्र राज्य)

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26